## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जमा व खर्चाचे सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे मूळ अंदाजाबाबत
## आयुक्त यांचे निवेदन

सन्माननिय सभापती मा.स्थायी समिती व स्थायी समिती सदस्य,सन्मा.सभागृह,पत्रकार बंधु आणि भगिनी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 95 नुसार नाशिक महानगरपालिकेच्या जमा व खर्चाचे सन 2017-18 चे सुधारित व 2018-19 चे मूळ अंदाज आपणासमोर सादर करीत आहे.

नाशिक महानगरपालिकेचे अंदाज सादर करताना पुढील वर्षातील नियोजन व विकासाची दिशा ठरविणे व गरजेनुसार आवश्यक प्रकल्प आणि Feasibility वर आधारित कामांचा विचार करतानाच जमा व खर्च यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.त्यादृष्टीने विविध स्तोत्रापासून प्राप्त होणाऱ्या जमेचा अंदाज लक्षात घेऊन महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठीच्या (Civic Amenities ) खर्चाचा ताळमेळ योग्यरित्या व प्राधान्यक्रम ठरवून घालणे आवश्यक आहे.

उत्पन्नाच्या बाजू निश्चित करताना न्याय संगत समतोल वितरण (Equitable Distribution), वापराप्रमाणे शुल्क आकारणीत सुसुत्रीकरण इत्यादी बाबी विचारात घेऊन शहरातील सर्वसामान्य घटकांवर जास्त बोजा न पडता ज्यांची आर्थिक क्षमता (Paying Capacity) आहे त्यांच्याकडून जास्त उत्पन्न प्राप्त होईल यावर भर देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामध्ये कर व पुरविण्यात येणाऱ्या सेवा यांचा विचार करुन वापरानुसार सेवा दर ठरविणे आवश्यक आहे. तथापि सद्यस्थितीत मागील सरासरी उपलब्धता व प्रलंबित थकित रक्कमा याचा विचार करुन अंदाज सादर करण्यात येत आहे.

दूसरीकडे 21 व्या शतकातील नाशिक शहराच्या गरजा लक्षात घेऊन खर्चाच्या बाबींचा प्राधान्यक्रम ठरविण्याचा प्रयत्न केला आहे.यामध्ये शहरातील जलवाहिन्या,मलनि:स्सारण वाहिन्या, पदपथ,शिक्षण,वैद्यकिय सेवा इ.नागरी सुविधांची पुर्तता शहरातील काही भागात जास्त तर काही भागात कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येत असून या असमतोल विकासाकडे कटाक्षाने लक्ष देऊन समतोल विकासावर भर देण्याचा प्रयत्न केला आहे. नाशिक शहर राहण्यासाठी आर्कषक व आर्थिक दृष्ट्या सक्षम (Liveable and Economically Vibrant) करण्याचा मनोदय आहे. शहरातील मुले, तरुण, प्रौढ, महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच उद्योजक व नोकरदार वर्ग अशा सर्वच घटकांना अपेक्षित असलेल्या योग्य सेवा-सुविधांची दर्जात्मक पूर्तता करण्यासाठी व महानगर पालिकेचे कामकाज ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन,नागरिकांना सुलभ,सोयीचे पारदर्शक व गतिमान प्रशासन उपलब्ध व्हावे याकरीता नाशिक शहराच्या गरजा व प्राथमिकता लक्षात घेऊन खर्चाच्या बाबींचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आलेला आहे.तसेच नागरिकांना Ease of serving व व्यावसायिक उद्योजकांना Ease of Doing Business निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आहे.

सन 2018-19 या वर्षाचे अंदाज सादर करताना मनपाचे हाती घेतलेल्या कामाचे दायित्व (Spill Works) व जमा होणाऱ्या रक्कमा अशा सर्व बाबींचा विचार करुन जमा-खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

## ◈ उत्पन्नाच्या बाबी :-

- महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नामध्ये मालमत्ता कर,जीएसटीच्या माध्यमातुन येणारे उत्पन्न, नगररचना विभागामार्फत प्राप्त होणारे शुल्क,पाणीपट्टी,मालमत्ता उपयोगिता,विविध सेवा व इतर साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे. उत्पन्नाच्या सर्व बाबी विचारात घेऊन सन 2018-19 चे अंदाज वास्तववादी असावे याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात येत असून जमेचे अंदाज सादर करण्यात येत आहेत.

### ➢ मालमत्ता कर :-

- कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये Tax Buoyancy असेल तरच आर्थिक वृध्दी होऊ शकते. Tax Buoyancy व्यवथा करताना Equitable,Simple,Rational and Wider tax Base या तत्वांवर आधारित असणे अपेक्षित असते. महानगरपालिकेचा सर्वात महत्वाचा कराचा स्रोत मालमत्ता कर हा आहे व त्यासाठी या सर्व तत्वांचा विचार केला गेला आहे.

- मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविताना सर्व मालमत्तांचे कर निर्धारण Complete व Correct असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मालमत्तांची झालेली कर निर्धारणा सोपी व सुटसुटीत असेल याची दक्षता घेण्यात आलेली असून याची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाराचे प्रदान योग्य त्या पातळीवर प्रथमत:च करण्यात आलेले आहे. त्यामुळे कामकाजात सुटसुटीतपणा येऊन नागरिकांना वेळेत कर भरण्यासाठी मदत होईल. कर कसुरदारांना नोटीस देण्याचे काम सुरु असून त्या अनुषंगाने वसुली करण्यात येत आहे. तसेच ज्यांनी नोटिस बजावल्यानंतरही कर भरणा केला नाही त्यांचे मालमत्ता अटकावणी/जप्ती करणे तसेच त्यांचे मालमत्तांचा लिलाव करण्याची कार्यवाही करणे प्रगती पथावर आहे.

- मालमत्ता कर भरणे नागरिकांना सुलभ व सोयीचे व्हावे यादृष्टीने क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंग,आरटीजीएस प्रणालीद्वारे ऑनलाईन कर भरण्याची सुविधा nmctax.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- मालमत्ता कर हा महानगरपालिकेचा सर्वात महत्वाचा उत्पन्नाचा मार्ग आहे त्यामुळे त्याचा उत्पन्नाच्या वाढीकडे प्राथम्याने लक्ष देण्यात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 99 नुसार या सर्व प्रयत्नांतून महानगरपालिकेचे सन 2016-17 या वर्षी झालेले रु.85.76 कोटी उत्पन्न सन 2017-18 या वर्षात रु.113.71 कोटी होणे अंदाजित आहे. तसेच सन 2018-19 या वर्षी रु. 253.00 कोटी होणे अंदाजित धरलेले आहे. ही वाढ सन 2017-2018 या वर्षाच्या तुलनेत 139.97 कोटी एवढी वाढ योजिलेले आहे. ही वृध्दी मागील वर्षाच्या तुलनेत 123.09 टक्के इतकी आहे. सदर वृध्दी ही टॅक्स रेट मध्ये झालेली वाढ याच बरोबर थकबाकी दरा विरुध्द सुरु करण्यात आलेली कार्यवाही व त्यांच्याकडून करण्यात येणारी वसुली बरोबरच सुटसुटीतपणा व सरळीकरण करण्यामुळे करदात्याकडून अनुपालन इत्यादीच्या माध्यमातुन उदीष्ट गाठणेत येईल.

- त्याचा भाग म्हणून राज्य शासना मार्फत लिडार बेस सर्व्हे करणेत आला आहे, त्यातुन नाशिक शहरातील संपुर्ण 360 डिग्री नकाशा (मॅप) तयार होत असुन मालमत्तांची सविस्तर माहिती उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिके मार्फत मालमत्ता कराचे उत्पन्न ठरवितांना व मालमत्ता करांची वसुली करतांना त्यामध्ये सुस्पष्टता व पारदर्शकता राहील हा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

याकरीता सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण व्हावे, कोणतीही मालमत्ता ही मालमत्ता करापासून वंचित राहू नये याकरीता नाशिक महानगरपालिकेने मालमत्ता सर्वेक्षणाचे काम हाती घेतले असून सर्व मिळकतींचे जीआयएस मॅपिंग करण्यात येत आहे. मे. जिओ इंन्फोसिस या एजन्सीची नियुक्ती करुन मालमत्तांचे प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाचे कामकाज जवळपास पुर्ण होत आलेले आहे.सदर सर्व्हेक्षणातुन प्रत्येक मिळकतीचे चटई क्षेत्राप्रमाणे मोजमाप घेणेत आले असुन,मिळकतींचे निवासी,बिगरनिवासी, वापरात बदल, भाडेकरी, वाढीव बांधकामे इ. शोधणेचे काम व पडताळणीचे काम सदर दोन्ही राज्य शासनाच्या लिडार बेस सर्व्हेक्षणातुन व मनपाने केलेले सर्व्हेक्षण यांचा मेळ घालुन मालमत्ता मधील त्रृटी शोधणेत येणार असुन त्यामध्ये टॅक्स नेट मध्ये न आलेल्या मिळकती शोधुन त्यावर कर आकारणी करणेत येणार आहे.

- मालमत्ता सर्व्हेक्षणामध्ये आतापर्यंत 393448 इ.मिळकतीचे सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण झाले असुन त्यापैकी मनपाचे अभिलेखावर असलेल्या मिळकतीपैकी 334568 मिळकतींचे सर्व्हेक्षण पुर्ण झाले असुन उर्वरित 58880 नविन मिळकती आढळुन आलेल्या आहेत.

ज्या इमारती आणि जमिनी यांना कर लावणेत आला नाही किंवा कमी क्षेत्रावर कर लागु करणेत आला आहे अशा सर्व इमारती व जमिनीवर कर आकारणी करणेत येणार आहे जेणे करुन Tax Base वाढुन मालमत्ता करामध्ये वाढ होईल.

## पाणीपट्टी :-

- महानगरपालिकेच्या अनेक कर्तव्यांपैकी नागरिकांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे ही अत्यंत महत्वाची मुलभुत सेवा आहे.त्यामुळे याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. यामध्ये नाशिक महानगरपालिकेस गंगापुर धरण व दारणा नदीवरील चेहेडी येथील बंधाऱ्यावरुन पाणी पुरवठा होतो तसेच भविष्यात पाणी पुरवठयाची निकड लक्षात घेता मुकणे धरणातुन पाणी पुरवठा करतांना भविष्यात नागरिकांना 24 X 7 पाणी पुरवठा करणेचे महानगरपालिकेचे ध्येय आहे.

- नाशिक महानगरपालिकेने सल्लागार नेमून पाणी लेखापरिक्षण (Water Audit) करण्यात आलेले असुन ड्राफ्ट अहवाल प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालानुसार हिशोबबाहय पाणी (NRW) 44% आहे असे निदर्शनास आले आहे. सदर अहवालानुसार सदर NRW हा मुख्यता: सद्यस्थितीतील नळजोडणीला असलेली मेकॅनिकल टाईप जलमापके नादुरुस्त असणे, प्रत्यक्ष वापरापेक्षा कमी रिडींग दाखवणारे जलमापके किंवा नळजोडण्यांची असलेली संख्या व देयके ग्राहकांपर्यंत पोहचविणे वेळेत पूर्ण न होणे. इत्यादी कारणांमुळे सरासरी प्रमाणे किंवा चुकीच्या पध्दतीने व कमी आकारणी करुन बिले देणे यामुळे अप्रत्यक्ष तुट दिसुन येते. तसेच जलशुध्दीकरण केंद्र,वितरण व्यवस्थेतील पाणी गळती व अनाधिकृत नळ जोडणी,पाणी चोरी इत्यादी मुळे प्रत्यक्ष झालेली तुट इत्यादी मिळून 44% पर्यंत NRW वाढलेला दिसत आहे. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

- हिशोब बाहय पाणी कमी करण्याच्या दृष्ट्रीने अनाधिकृत नळजोडण्या खंडीत करावयाची धडक कारवाई हाती घेण्यात आली आहे. अनाधिकृत नळ जोडण्या खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

- सदय: स्थितीत दरवर्षी पाणी पुरवठा करणेसाठी दुरुस्ती व देखभाल खर्च पाणीपट्टी वसुलीपेक्षा जास्त असल्यामुळे जमा व खर्चात तफावत आहे. हे सर्व करत असतांना मा. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.02/08/2010 रोजीचा निर्गमित शासन निर्णयान्वये पाणी पुरवठा यंत्रणा ना नफा ना तोटा तत्वावर चालविणे आवश्यक आहे.त्यामुळे पाणी पुरवठा योजना

चालविणेसाठी येणारा खर्च म्हणजे पाणी उत्पादन खर्च भरुन काढणे इतपत उपभोक्ता आकार (पाणीदर) लावणेबाबत सुचना केली आहे. या शासन निर्णयामध्ये विहीत मार्गदर्शक तत्त्वानुसार पाणी पट्टीचे दर व्हॅल्युमेट्रीक (Volumetric) पध्दतीने आकारणेत यावे असे नमुद केले आहे. देखभाल दुरुस्ती कार्यक्षम करणेचे दृष्टीने तसेच कमी पाणी वापर करणाऱ्या नागरीकांना त्यांच्या वापराएव्हढेच दर लावुन जनतेवर जास्त कराचा बोजा न लादता, जो जास्त पाणी वापरेल त्यालाच पाणी वापरानुसार जास्त दर हे टेलिस्कोपिक (Telescopic) रेटचे व इक्विटेबल टॅक्सेसचे न्यायतत्व व वापरानुसार दर (User Charges) हे तत्व वापरुन नवीन कररचना करणे आवश्यक आहे. नाशिक मनपाने सन 2009-10 पासुन पाणीपट्टी दरामध्ये वाढ केलेली नाही. त्यामुळे शासन निर्णयात नमुद मार्गदर्शक तत्वानुसार टेलिस्कोपिक पध्दतीने पाणीदर लावण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर करण्यात येईल. तथापि सद्या अस्तित्वात असलेल्या दरानुसार सन 2018-2019 मध्ये पाणीपट्टीचे माध्यमातुन रु.60.00 कोटी वसुलीचे उदीष्ट निश्चित करणेत आले आहे. सदरचे उदिष्ठ सन 2017-2018 च्या तुलनेत.43.69 टक्के इतकी जास्त आहे. सदरचे उदिष्ठ साध्य करण्यासाठी जलगळती थांबविणे,एनआरडब्ल्यू कमी करणे, अनाधिकृत नळ जोडणीवर कारवाई करणे व थकबाकी वसुल करणे इ.माध्यमातुन करण्यात येईल.

## ➢ स्थानिक संस्था कर/जीएसटी.

- दिनांक 1 जुलै 2017 पासुन संपुर्ण देशामध्ये जीएसटी कर प्रणाली लागु करणेत आलेली आहे.
- सध्या शासनाकडुन सन 2017-18 चालु आर्थिक वर्षामध्ये जीएसटी अनुदानापोटी दरमहा रक्कम रुपये 73.40 कोटी इतके अनुदान प्राप्त होत आहे.
- शासनाने 15 सप्टेंबर 2015 रोजीचे पत्रानुसार ज्यावेळी 50 कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापा-यांना स्थानिक संस्था करातुन वगळले होते त्या बदल्यात स्थानिक संस्था करामध्ये होणारी तुट भरुन काढणेकरीता स्थानिक संस्थाना अनुदान देण्याचे धोरण निश्चित केले होते त्या धोरणानुसार स्थानिक संस्था कर रदद् केल्यामुळे सध्या दरमहा मिळत असलेले अनुदान रक्कम रुपये 73.40 कोटी असे 12 महिन्याचे 73.40X12 = 880.80 यामध्ये सन 2018-19 करीता 8 टक्के वाढ गृहीत धरल्यास 951.26 कोटी इतके अनुदान प्राप्त होऊ शकते. त्यानुसार सन 2018-19 करीता अंदाज धरण्यात आलेला आहे.
- तसेच सन 2013-14,2014-15 व 2015-16 अशा तिन वर्षातील एकुण मिळुन 59774 इतक्या विवरणपत्रकांच्या निर्धारणाचे काम प्रलंबित आहे. सन 2018-19 या आर्थिक वर्षामध्ये प्रलंबित निर्धारणाचे कामे पुर्ण करण्यात येणार असुन त्याद्वारे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
- शासनाकडुन जीएसटी अंतर्गत मिळणारे अनुदान व उर्वरित निर्धारणाद्वारे अपेक्षित उत्पन्न असे दोन्ही मिळुन मनपास 967.26 कोटी इतके उत्पन्न सन 2018-19 मध्ये प्राप्त होईल असा अंदाज आहे.

## ➢ नगररचना विकास शुल्क :-

- नगररचना विभागामार्फत प्रामुख्याने बांधकाम परवानगी, भोगवटा दाखला, तात्पुरता व अंतिम अभिन्यांस व झोनिंग दाखला इ.प्रकारच्या सेवांकरिता शुल्क आकारण्यात येतात. नाशिक शहराच्या विकास योजना आराखडयास शासन अधिसुचना दिनांक 9 जानेवारी 2017, अन्वये मंजुरी

मिळालेली असुन विकास आराखडया समवेत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-2017 देखील मंजुर करण्यात आलेली आहे.

- विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-2017 मध्ये Premium Paid FSI (अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक ), रस्त्याच्या रुंदीनुसार वाढीव टीडीआर व वाढीव एफएसआय अनुज्ञेय करण्यात आलेले असुन टीडीआर वापराकरिता 5% पायाभूत सुविधा शुल्क (Infrastructure Charges) लागू करण्यात आलेले आहे.टीडीआर व वाढीव एफएसआयमूळे Maximum Building Potential वाढणार असल्याने उत्पन्न वाढीस मदत होणार आहे.तसेच शासन निर्णय दि.7/10/2017 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 मधील कलम 52 (क) नुसार दिनांक 31/12/2015 पुर्वी झालेली अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्क लावुन (Compounding Charges) प्रशमित संरचना (Compounded Structure) म्हणुन नियमित करणेबाबतचे धोरणास मंजुरी दिल्याने अशी बांधकामे नियमितीकरण करतांना लागु होणारे प्रशमन शुल्क (Compounding Charges),प्रशमित संरचना पायाभूत सुविधा शुल्क (Compounded Structure Infrastructure Charges),प्रशमित संरचना प्रिमियम शुल्क (Compounded Structure Premium Paid FSI) यामूळे देखील उत्पन्न वाढीस मदत होणार आहे.
- वरील बाबींचा विचार करता सन 2018-19 चे अंदाजपत्रकामध्ये नगररचना विभागाकरिता ठरवुन देण्यात आलेले रक्कम रु.155.62 कोटी उद्दिष्ट प्राप्त शक्य होणार आहे. सदरची वाढ ही मागील वित्तीय वर्षाच्या तुलनेत 23.73 टक्के जादा आहे.

## ➢ इतर कर व शुल्क

- **<u>वाहनतळ (पार्कींग):-</u>**शहरातील वाढती लोकसंख्या तसेच त्यांचे दिवसांगणिक बदलणारे राहणीमान यामुळे वाढणारी वाहनांची संख्या यांचा विचार करता शहरामध्ये वाहनतळाची सुविधा अधिकाधिक उपलब्ध व्हावी.या उद्देश्याने व मनपासाठी सदर वाहनतळाची जागा हे महत्वाचे उत्पन्नाचे स्रोत म्हणुन बघण्याची आवश्यकता निर्माण झालेली असल्याने प्रत्येक जागेच्या आकारावर पार्क होणा-या वाहनांची संख्या व त्याव्दारे मिळू शकणारे संभाव्य उत्पन्न याचा विचार करुन स्मार्ट सिटी अंतर्गत एकुण **33** ठिकाणी पार्कींगचे नियोजन आहे. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहनांची गर्दी कमी होण्यास निश्चितच मदत होईल.
- **ऑनस्ट्रिट पार्कींग:-**प्रमुख रस्त्याच्या बाजुला नियोजित पध्दतीने वाहने पार्कींग करणे(रस्त्याच्या बाजुला दुचाकी/चारचाकी वाहनांसाठी जागा निश्चित करणे.) एकुण **5** ठिकाणी ऑनस्ट्रिट पार्कींगचे नियोजन आहे.
- **ऑफस्ट्रिट पार्कींग:-**पार्कींगकरीता एकच आंत येणारे व बाहेर जाणारे **(Entry & Exit)** अशा जागेमध्ये नियोजन पध्दतीने जागा उपलब्ध करुन पार्कींगसाठी देता येईल. सदर पार्कींगचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याचे मनपाचा मानस आहे. एकुण **28** ठिकाणी ऑफस्ट्रिट पार्कींगचे नियोजन आहे.
- सदर नियोजित पार्कींग करीता वाहनधारकांकडून खालीलप्रमाणे प्रति तास वाहनतळ फी (दरनिश्चिती) वसुलीकरीता निश्चित करणेत आलेली आहे.

अ) ऑफ स्ट्रिट पार्कीगसाठी फी

| अ.क्र. | वाहन तपशिल | ऑफ स्ट्रिट पार्कीगसाठी नवीन फी चे दर (प्रति तास) |
|---|---|---|
| 1. | कार/जिप/टॅक्सी इ.यासारखे चार चाकी वाहने | रु.20.00 |
| 2. | रिक्षा तीनचाकी वाहने | रु.20.00 |
| 3. | मोटर-सायकल/स्कूटर/लुना इ.दुचाकी वाहने | रु.10.00 |
| 4. | सायकल | रु.5.00 |
| 5. | बस | रु.40.00 |
| 6. | ट्रक व टेम्पोसाठी | रु.40.00 |

अ) ऑन स्ट्रिट पार्कीगसाठी फी

| अ.क्र. | वाहन तपशिल | ऑन स्ट्रिट पार्कींग साठी नवीन फी चे दर (प्रति तास) |
|---|---|---|
| 1. | कार/जिप/टॅक्सी इ.यासारखे चार चाकी वाहने | रु.30.00 |
| 2. | रिक्षा तीनचाकी वाहने | रु.30.00 |
| 3. | मोटर-सायकल/स्कूटर/लुना इ.दुचाकी वाहने | रु.15.00 |
| 4. | सायकल | रु.5.00 |
| 5. | बस | रु.100.00 |
| 6. | ट्रक व टेम्पोसाठी | रु.100.00 |

स्मार्ट सिटी अंतर्गत सदर प्रकरणी निविदा प्रकिया पुर्ण झाली असुन ती लवकरच कार्यान्वीत करण्यात येत आहे. जेणे करुन अधिकचे उत्पन्न मिळेल व शहरात ट्रॅफिकचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यास मदत होईल. या पॉलीसी नुसार मनपास सुमारे १ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. सदरचा स्त्रोत हा नवीन स्त्रोत असल्याने यापुढेही या स्त्रोतामधुन जास्तीत जास्त उत्पनवाढीसाठी प्रयत्न केले जातील.

- <u>जाहीरात होर्डीग</u> :-

1. मनपा मालकीचे जागेवरील तात्पुरत्या स्वरुपात (कमीत-कमी तीन दिवसांकरीता) 10 X 10 साईजचे जाहीरात होर्डीग संख्या :- 69
2. मनपा मालकीचे जागेवरील तात्पुरत्या स्वरुपात (कमीत-कमी तीन दिवसांकरीता) 20 X 10 साईजचे जाहीरात होर्डीग संख्या :- 11
3. मनपा मालकीचे जागेवर ई-निविदेव्दारे देणेत आलेले जाहीरात होर्डीग संख्या:-39
4. खाजगी जागेवरील अधिकृत जाहीरात होर्डीग संख्या:- 826

- व्यवसाय परवान्यांप्रमाणेच शहर सौदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातुन विविध जाहीरात माध्यमे (Hoarding) उभारणेबाबत तसेच विद्युत खांबांवर जाहिरात करणेबाबतची निविदा प्रक्रिया राबवून महानगरपालिकेस भरीव उत्पन्न प्राप्त करुन देण्याचा प्रयत्् केला जात आहे.तसेच,मनपाचे मालकीचे अधिकृत जाहीरात होर्डीग करीता नव्याने जागा शोधुन त्याव्दारे मनपाचे उत्पन्न वाढविणेचे प्रयत्न केले जाणार असुन नव्या जागा शोधतांना शहर विद्रुपीकरण होणार नाही याची देखील काळजी घेतली जाणार आहे.

- तसेच,अनधिकृत जाहीरात होर्डीग शोधुन त्यांच्यावर दंडात्मक स्वरुपाची तसेच ते अतिक्रमण विभागाच्या मदतीने हटविणेबाबतची कारवाई प्रस्तावित असुन शहरातील अनधिकृत होर्डीगमुळे होणारे विद्रुपीकरण थांबविले जाणार आहे. जाहीरात होर्डीगचा जाहीरात कर तसेच परवाना फी यामध्ये वाढ करणेचा प्रस्ताव सादर करणेत येणार आहे.
- होर्डींग व परवाना फी च्या माध्यमातुन सन 2017-18 मध्ये एकुण र.रु.141.93 लाख वसुली होणे अपेक्षित असुन सन 2018-19 करीता र.रु.200.00 लाख वसुल होणे अपेक्षित आहे. मागील वर्षाच्या तुलनेत 58.07 लक्ष इतकी वाढ अंदाजपत्रकात उदिष्ठात धरण्यात आली आहे.

➢ <u>मनपा मालकीचे गाळे</u> :-

मनपा मालकीचे एकुण शॉपिंग सेंटर संख्या:- 59

| अ.नं. | तपशिल | एकुण संख्या | वाटप संख्या | रिक्त संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | मनपा मालकीचे गाळे | 1962 | 1849 | 113 |
| 2. | मनपा मालकीचे ओटे | 803 | 312 | 491 |
| | एकुण | 2765 | 2161 | 604 |

- मनपा मालकीचे शॉपिंग सेंटर मधील गाळयांचे जागा लायसेन्स फी मध्ये शिघ्रगणक दराने वाढ केलेनुसार एकुण मागणी (Demand) र.रु.43.89 कोटी असुन माहे.जानेवारी-2018 अखेर वसुली र.रु.6.21 कोटी झालेली असुन वसुलीचे प्रमाण 14.17 टक्केच आहे. सदरची थकबाकी वसुली करणेकामी संबंधितांना नोटीसा बजाविणेत आलेल्या आहेत. त्यानुसार संबंधितांनी जागा लायसेन्स फी व इतर सरकारी करांचा भरणा मुदतीत न केल्यास गाळा जप्तीची कारवाई करणेत येणार आहे. वित्तीय वर्ष 2018-2019 मध्ये रु.48 कोटी उदिष्ठ धरण्यात आले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत रु.33 कोटी ची वाढ करण्यात आली असुन एकुण उदिष्ठात 220 टक्के वाढ केली आहे.

- <u>परवाना शुल्क</u> :- परवाना विभाग महानगरपालिकेचा महत्वाचा विभाग असतांना याकडे काहीसे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 313 अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक आहे.तथापि,आतापर्यंत अशा परवाना शुल्काची आकारणी करणेत आलेली नाही.तथापि, या वर्षात परवाना शुल्काचे वसुलीची अंमलबजावणी करणेत येणार असुन त्याद्वारे महानगर पालिकेस उत्पन्न प्राप्त होणार आहे.त्यासाठी नगररचना व मालमत्ता विभाग या विभांगासोबत ताळमेळ घेतला जाणार आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 313 अन्वये मा.महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे.

- व्यवसाय परवाना देण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्यासाठी ऑनलाईन परवाना देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.त्या सोबतच परवाना नुतनीकरण सुविधाही ऑनलाईन उपलब्ध् करुन देण्यात येणार आहे. ऑनलाईन परवाने देतांना नागरिकांना सुलभ व्हावे याकरीता आवश्यक कागदपत्रांची संख्या मोजकीच ठेवण्यात येणार आहे.

## एकुण जमेचा संक्षिप्त गोषवारा खालील प्रमाणे

सन 2017-2018 चे सुधारीत व सन 2018-2019 चे जमा रक्कमांचा अंदाजपत्रकीय गोषवारा.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सन 201६-201७ मा.आयुक्तांनी केलेला सुधारीत अंदाज | सन 2017-2018 मा.आयुक्तांनी केलेला सुधारीत अंदाज | सन 2018-2019 मध्ये आयुक्तांनी केलेला मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| 1 | जकात/स्थानिक संस्था कर/वस्तु व सेवा कर (G.S.T) सहा.अनुदान | ८१००९.३३ | 94659.00 | 96726.00 |
| 2 | एकत्रित कर (घरपटटी) | ८१८८.४३ | 11371.78 | 25369.04 |
| 3 | विकास कर | ३१०७.५९ | 5904.00 | 6940.00 |
| 4 | सेवा सुविधांपासून उत्पन्न | १८७६.८३ | 9526.99 | 15398.40 |
| 5 | संकिर्ण | ११६२८.०० | 3970.20 | 3161.20 |
| 6 | पाणी पुरवठयापासुन उत्पन्न | ४०७२.२७ | 4175.65 | 6000.00 |
| 7 | परिवहन सेवा उत्पन्न | ० | 1.00 | 1.00 |
| 8 | एकुण स्वत:चे उत्पन्न (1 ते 7) | १०९८८२.४५ | 129608.62 | 153595.64 |
| 9 | अनुदाने | ९०१.०७ | 3473.00 | 5543.50 |
| 10 | कर्ज (घरकुलल योजना) | ५०००.०० | 3000.00 | 500.00 |
| 11 | इतर उचल रक्कमा | ९६७१.८४ | 7920.10 | 13977.00 |
| 12 | इतर उत्तन्न (9 ते 11) | ११५७२.९१ | 14393.10 | 20020.50 |
| 13 | एकुण उत्तन्न (8+12) | १२५४५५.३६ | 144001.72 | 173616.14 |
| 14 | प्रारंभिक शिल्लक | १४७९०.८४ | 1337.97 | 4898.57 |
| **15** | **प्रारंभिक शिल्लकेसह एकुण एकंदर उत्पन्न (13+14)** | **१४०२४६.२०** | **145339.60** | **178514.71** |

एकंदर सन 2018-2019 मध्ये उत्पन्नाच्या बाबींमध्ये होणाऱ्या वृध्दीमुळे व प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या नियोजन बध्द प्रयत्नामुळे एकुण जमा रु. 1785.15 कोटी म्हणजेच सन 2017-2018 च्या जमा रकमेच्या तुलनेत रक्कम रु.331.75 कोटी एवढी वाढ अपेक्षित आहे. म्हणजेच सर्वसाधारणपणे जमा बाजुस 22.83 टक्के वृध्दी अपेक्षित आहे.

## ◈ खर्चाच्या बाबी :-

- महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापासुन खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना शहरातील लहान मुले,विदयार्थी,तरुण वर्ग,प्रौढ,जेष्ठ नागरिक,महिला,सर्व सामान्य घटक व मागासवर्गीय अशा सर्व वर्गाना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.
- ®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®ÖÖ ¿ÖÆü¸üÖ´Ö¬µÖ ×±ú¸üÝÖÖ®ÖÖ ÛúÖÞÖÝµÖÖÆüß ¯ÖÛúÖ¸ü“ÖÖ †›ü£ÖôûÖ ¾ÖÖ †›ü“ÖÞÖ µÖÞÖÖ¸üü ®ÖÖÆüß µÖÖ“Öß ÛúÖôûÖ•Öß ‘Ö‰ú®Ö †›ü£ÖôûÖ´ÖŒÝÖ ¸üÃÝÖ ¾Ö ¯Ö¤ü¯Ö£Ö (Barrier Free Roads and Foothpath), ´Ö»ÖÖ®ÖÖ–®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®ÖÖ ÜÖôûÞµÖÖÛú¸üßÝÖÖ ´Ö¤üÖ®Ö,×¾Ö¸üÝÖóµÖÖÃÖÖšüß ^ªÖ®Ö,×¾Ö¿ÖÂÖ

¯ÖÖ×¾ÖÞµÖ ¯ÖÖ¯ÖŸÖ Ûú¸üÞµÖÖÃÖÖšÖß ÜÖÔÖÖ“Öß ¾Ö×¿ÖÂ™üµÖ¯ÖÞÖ ´ÖÖ¤üÖ®Ö, “ÖÖÝÖ»µÖÖ ¿ÖõÖ×ÞÖÛú ÃÖ×¾Ö¬ÖÖÃÖÖÆü ^¢Ö´Ö ¯ÖÛúÖ¸ü“µÖÖ ¿ÖÖÔÖ ¾Ö ´Ö¤üÖ®Ö,†Ö¸üÖŸµÖÖ“µÖÖ Ý֏ü•ÖÖ ¯Ö¸ü×¾ÖÞµÖÖÃÖÖšÖß ¹ýÝÞÖÖ»ÖµÖ,ÛúÖµÖÖ»ÖµÖÖ“Ö †Ö¬Ö×®ÖÛúßÛú¸üÞÖ ¾Ö Ÿ֏¹ýÞÖÖ®ÖÖ ®ÖÖÛú¸üß“µÖÖ †£Ö¾ÖÖ ^ªÖÝÖÖ“µÖÖ Ã֬֍ß †¿ÖÖ ¯ÖÛúÖ¸ü“µÖÖ ×¾Ö×¾Ö¬Ö ³ÖÖ×ŸÖÛú ÃÖ×¾Ö¬ÖÖ ^¯Ö»Ö²¬Ö Ûú¹ý®Ö ¤üÞµÖÖÃÖÖšÖß ÜÖ“ÖÖ“ÖÖ ¯ÖÖ¬ÖÖ®µÖÛú´Ö š¸ü×¾ÖÞµÖÖŸÖ †Ö»Ö»ÖÖ †ÖÆü.

- **<u>®ÖÖÝÖ¸üß ÃÖÖ¾ÖÖ (Civic Services) :-</u>**
- ¿ÖÆü¸üÖŸÖß»Ö ®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®ÖÖ ^““Ö ¤ü•ÖÖ“µÖÖ ®ÖÖÝÖ¸üß ÃÖ×¾Ö¬ÖÖ ^¯Ö»Ö²¬Ö Ûú¹ý®Ö ¤üÞµÖÖÃÖÖšÖß मनपा कटीबध्द आहे.¸ÃŸµÖÖ“Öß ÃÖ¬ÖÖ¸üÞÖÖ, ¸üÃŸÖÖ ¤ü³ÖÖ•ÖÛúÖ“Öß ÃÖ¬ÖÖ¸üÞÖÖ, ÝÖ™üÖ¸ü-±ú™ü¯ÖÖ£Ö ÃÖ¾µÖ¾Ö×ÃÖ£ÖŸÖ šü¾ÖÞÖ ‡. ÃÖ×¾Ö¬ÖÖ ¤üÞµÖÖ“ÖÖ ¯ÖµÖŸ®Ö †ÖÆü.
- ¿ÖÆü¸üÖŸÖß»Ö ®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®ÖÖ 1Ÿ2 ×Ûú´Öß †ŸÖ¸üÖ¾Ö¸ü †ÃÖÞÖÖ-µÖÖ ´ÖÖÛú™ü,¿ÖÖÔÖ,´Ö¤üÖ®Ö,^ªÖ®Ö,¿ÖÖØ¯ÖÝÖ ÛúÖ´¯»ÖŒÃÖ,¹ýÝÞÖÖ»ÖµÖ ‡.¯ÖµÖŸÖ •ÖÖÞµÖÖÃÖÖšÖß †›ü£ÖÔÖ´ÖŒŸÖ ¸üÃŸÖ ¾Ö ¯Ö¤ü¯Ö£Ö,×¾Ö×¾Ö¬Ö ´ÖÖÝÖ¤ü¿ÖÛú ®ÖÖ´Ö±úü»ÖÛú,ÃÖ¾µÖ¾Ö×ÃÖ£ÖŸÖ ¸üÃŸÖ ÛúÖØÃÖÝÖ ÃÖ×¾Ö¬ÖÖ ŸÖÃÖ“Ö ÃÖÖµÖÛúØ»ÖÝÖ ™üÛú †¿ÖÖ ÃÖ×¾Ö¬ÖÖ ¤üµÖÖ“ÖÖ ´ÖÖ®ÖÃÖ †ÖÆü.ŸÖÃÖ“Ö ´Ö»ÖÖ®ÖÖ ÜÖÔÖµÖÖÃÖÖšÖß ´ÖÖÛúÔß ´Ö¤üÖ® ×¾ÖÛú×ÃÖŸÖ Ûú¸üÞÖ,®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®ÖÖ ×¾Ö¸üÝÖÔµÖÖÃÖÖšÖß “ÖÖÝÖ»Öß ^ªÖ®Ö ^¯Ö»Ö²¬Ö Ûúºþ®Ö ¤üÞµÖÖ“ÖÖ ¯ÖµÖŸ®Ö †ÖÆü.
- Walkability- †ÖÝÖÖ´Öß ÛúÖÔÖŸÖ ¿ÖÆü¸üÖŸÖß»Ö ¯ÖµÖÖÔ¾Ö¸üÞÖ Ã֏õÖÞÖ ¾Ö ÃÖ¾Ö¬Ö®ÖÖ“µÖÖ ¥Â™üß®Ö ‘Ö¸ü¯ÖÖÃÖ®Ö •Ö¾ÖÔ“µÖÖ 1Ÿ2 ×Ûú´Öß †ŸÖ¸üÖ¾Ö¸üß»Ö ´ÖÖÛú™ü,¿ÖÖÔÖ,´Ö¤üÖ®Ö,^ªÖ®Ö,¿ÖÖØ¯ÖÝÖ ÛúÖ´¯»ÖŒÃÖ, ¤ü¾ÖÖÜÖÖ®Ö ‡.¯ÖµÖŸÖ •ÖÖÞµÖÖÃÖÖšÖß ®ÖÖÝÖ×¸üÛúÖ®Öß ¾ÖÖÆü®ÖÖ“ÖÖ ¾ÖÖ¯Ö¸ü ®Ö Ûú¸üŸÖÖ ÃÖ³ÖÖ¾µÖ ¯Ö¤üÂÖÞÖ ™üÖÔÖ®Ö पायी चालणे किंवा सायकलीचा वापर करणे करीता µÖÖÛú¸üßŸÖÖ †›ü£ÖÔÖ´ÖŒŸÖ ¸üÃŸÖ ¾Ö ¯Ö¤ü¯Ö£Ö,×¾Ö×¾Ö¬Ö ´ÖÖÝÖ¤ü¿ÖÛú ®ÖÖ´Ö±úü»ÖÛú, ÃÖ¾µÖ¾Ö×ÃÖ£ÖŸÖ ¸üÃŸÖ ÛúÖØÃÖÝÖ ÃÖ×¾Ö¬ÖÖ ŸÖÃÖ“Ö ÃÖÖµÖÛúØ»ÖÝÖ ™üÛú †¿ÖÖ ÃÖ×¾Ö¬ÖÖ ¤üµÖÖ“ÖÖ ´ÖÖ®ÖÃÖ †ÖÆü. त्यासाठी नवीन कार्यक्रम हाती घेण्यात येत असुन नाशिक शहर हे बॅरीअर फ्री सिटी (अडथळामुक्त शहर) करण्यात येणार आहे. सदरच कार्यक्रम हा पुर्ण शहरभर राबवुन पुढील दोन वर्षात शहर हे अडथळा मुक्त करण्यात येईल.
- शहरामध्ये दिव्यांग व जेष्ट नागरीकांना सार्वजनिक सेवा सुविधांचा सुलभतेने वापर करता येण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्याचा मानस आहे. तसेच नाशिक मनपाच्या मुख्य कार्यालय व सहा विभागीय कार्यालयामध्ये विविध उपाययोजना करण्याचे नियोजन आहे. तसेच शहरातील विविध भागांमध्ये असलेल्या मुख्य रस्ते व चौक,अस्तित्वातील फुटपाथ किंवा नवीन फुटपाथ चे सुयोग्य नियोजन करून दिव्यांग व जेष्ठ नागरिकांना वापरणे सुलभ होईल याप्रमाणे विकसित करण्याचे नियोजन आहे.
- नाशिक शहर अडथळामुक्त (Barrier Free City-Everybody Matter) करणेसाठी विविध उपाय योजना करणे यासाठी सन 2018-19 या वर्षात रु.5 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुद ही प्रथमच करण्यात येत असुन शहरामध्ये वॉकबिलीट वृध्दींगत करण्यासाठी वापरुन शहर अडथळा मुक्त करण्याच्या दृष्ट्रीने पहिले पाऊल असणार आहे.

<u>सायकल ट्रॅक व जॉंगिग ट्रॅक विकसित व सुधारीत करणे</u>.-

- नाशिक शहरात प्रायोगिक तत्वावर नाशिक (पश्चिम) विभागात कृषीनगर येथे सुमारे 900 मीटर लांबीचा सायकल ट्रॅक विकसित करणेत येत आहे. याप्रमाणे उपयुक्तते नुसार इतर भागातही स्वतंत्र सायकल ट्रॅक विकसीत करणेत येईल.
- शहरातील अस्तित्वातील मुख्य रस्ते व नव्याने विकसित करावयाचे रस्ते या मध्ये सायकल ट्रॅक सह विकसीत करणेचा मानस आहे.

- पीपीपी तत्वावर फुलोरा फाऊंडेशन सोबत करार करुन शहरामध्ये Public Bicycle Sharing कार्यक्रम सुरु करण्यात येत आहे. त्यामध्ये सायकल उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर Bicycle हया Geo-Tag असतील जेणे करुन वापरकर्त्यास सुलभता होऊन cycling चा वापर वाढेल जेणेकरुन शहरातील प्रदुर्षण कमी होणेस मदत होईल. सदर संस्थे बरोबर सामजंस्य करार झालेला असुन पुढील काही दिवसातच बायसिकल शेअरींग कार्यान्वीत करण्यात येत आहे.
- नाशिक शहरातील विविध ठिकाणी असलेल्या जॉगिंग ट्रॅकचे व मैदानांची सुधारणा व नुतनीकरण करणेसाठी क्रीडा विषयक राखीव तरतूदीमधून विविध कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**<u>स्मशान भुमी विकास</u>**

- नाशिक शहरातील सर्व स्मशान भुमीचीं सुधारणा व नुतनीकरण करणेचे नियोजन आहे.नाशिक शहरातील सर्वच स्मशानभुमीचे आवश्यकतेनुसार सुधारणा करून नुतनीकरण करणेच्या मागण्या सदस्यांकडून प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार संपुर्ण शहरातील सुमारे 17 ठिकाणचे कामे या वर्षी हाती घेणेत येणार आहेत. या करीता सन 2018-2019 चे अंदाजपत्रकात सुमारे 10 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

**<u>पी.पी.पी. तत्वावर प्रकल्प राबविणे</u>**

- नाशिक मनपाचे सार्वजनिक वापरासाठी तसेच वाणिज्य वापराचे विविध विभागातील मोठ्या क्षेत्रांचे भुखंड पी.पी.पी.तत्वावर विकसीत करणेस महासभेच्या मान्यतेनुसार तीन तज्ञ सल्लागारांचे पॅनल नियुक्त केले आहे. याप्रमाणे विविध योजना / प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर राबविणेत येणार आहे.
- यामध्ये यावर्षी नवीन नाशिक येथील पेलिकन पार्कच्या 17 एकर जागेवर सेंट्रल पार्क विकसित करणे व दादासाहेब फाळके स्मारक पीपीपी तत्वावर विकसीत करणेचे नियोजन आहे.

**<u>रस्ते विकास</u>**

- नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकूण सुमारे 1900 कि.मी. लांबीचे रस्ते असून त्यापैकी सुमारे 260 कि.मी. लांबीचे रस्ते खडीचे आहेत. या रस्त्याचा प्राधान्याने विकास करणे आवश्यक आहे. त्यामुळे जे रस्ते कच्च्या स्वरुपाचे आहेत अशा सुमारे 55 कि.मी. रस्त्यांचे मजबुतीकरण करून खडीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच यापुर्वी खडीकरण झालेले सुमारे 80 कि.मी. रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. अंबड एम.आय.डी.सी. मधील सुमारे 10 कि.मी. व सातपुर एम.आय.डी.सी. मधील सुमारे 15 कि.मी. रस्त्यांचे अस्तरीकरण करण्याचे प्रस्तावीत आहे.
- भविष्यात रस्त्यांची कामे करतांना विकास आराखड्यानुसार असलेली रुंदी अथवा मंजुर ले आऊट मधील रस्त्याची रुंदी (Right of Way) याचा विचार करून त्यामध्ये Carriage Way ची आवश्यक रुंदी,पावसाळी पाण्याचा निचरा करणारी जलनि:सारण व्यवस्था,आवश्यक युटीलिटी डक्टस्, फुटपाथ, सायकल ट्रॅक इ. सुविधांचा अंतर्भाव करून शहरातील सर्व नागरिकांना सुव्यवस्थित रस्त्याची सुविधा देण्याचा मानस आहे. या मध्ये Missing Link असलेले रस्ते प्राधान्याने घेणेत येतील. सन 2018-19 या वर्षात रस्ते विकास (भांडवलीसाठी) रु.70 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

पार्कींग व्यवस्था

- नाशिक शहरात विविध मुख्य रस्त्यावरील सुमारे 34 ठिकाणी समांतर पार्कींग व उपलब्ध असलेल्या सुमारे 7 भुखंडावर पार्कींग व्यवस्थापनासाठी कार्यवाही करणेचे नियोजन आहे. यासाठी IT च्या वापर करून स्मार्ट पार्कींग व्यवस्थापन करणेचा मानस आहे. सन 2018-19 या वर्षात पार्किंग व्यवस्थेसाठी रु.2.19 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

## ➢ घनकचरा व्यवस्थापन

- घनकचरा व्यवस्थापन हा शहरांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा विषय आहे.ज्यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण करणे,वर्गीकरण केलेला कचरा साठवणूक करणे, कचऱ्याची वाहतूक करणे,कचऱ्यावर प्रक्रिया करणे व सुरक्षित विल्हेवाट लावणे या बाबींचा समावेश होतो.याचा सर्वंकष विचार करुन एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी खालील बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

  1) निर्मितीच्याच ठिकाणी कचरा विलगीकरण करुन कमी करणे व त्याचा पुनर्वापर करणे.

  2) कचरा पुनर्चक्रित करणे (प्लास्टिक,पेपर,धातूच्या वस्तू, काचा,इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू पुनर्वापरात आणणे

  3) ओल्या घरगुती कचऱ्यापासून खत निर्मिती करणे.

- घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये सदयस्थितीत कार्यरत असलेली स्वच्छता यंत्रणा व वाहतूक यंत्रणा अधिक कार्यक्षम करुन शहरातील स्वच्छता वाढविण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत कचरा निर्माण होतो त्याच ठिकाणी कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण (Segregation at Source) करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. सर्व नागरिकांनी स्वत: निर्माण केलेला कचरा विलगीकरण करुन कुंडीमध्ये साठवुन ठेवावा. मनपाचे गारबेज व्हेईकल मध्ये सदर कचरा जमा करणे आवश्यक आहे. त्यासाठी ट्रॅकींग,अलॉर्म सिस्टीम,कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्याचा वापर करुन नागरीकांनी कचऱ्याची विल्हेवाट करावी. कोणत्याही परिस्थितीत कचरा रस्त्यावर फेकु नये. नागरीकांनी कचरा विलगीकरण न केल्यास त्यांच्या विरुध्द SWM Rules 2016 नुसार दंडनीय कारवाई करण्यात येईल. सदर कारवाईचा परिणाम न झालेस सदर नागरीकांचा कचरा उचलला जाणार नाही. दिनांक 31 मार्च 2018 नंतर दंडनीय कारवाई सोबतच कचरा विलगी करण न करणाऱ्या नागरिक,संस्था यांचे विरुध्द SWM Rules नुसार कचरा न उचलण्याची कारवाई करण्यात येइल.

- त्याचप्रमाणे नाशिक शहर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.त्या अंतर्गत नागरिकांचे व दुकानदारांचे प्रबोधन करणे,प्लास्टिक मुक्ती जनजागृतीपर विविध कार्यक्रम राबविणे,प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद करण्यासाठी कडक अंमलबजावणी करणेत येत आहे. आगामी काळात सर्व शहरामध्ये याची कडक अंमलबजावणी करण्यात येईल. R-4 म्हणजेच Reduce, Recycle, Reuse and Refuse या तत्वांचा वापर करुन प्लास्टिक मुक्तीकडे सकारात्मक वाटचाल करण्यात येईल. प्लॉस्टीकचा विक्री/वापर करणाऱ्याविरुध्द Environment Protection Act नुसार कारवाई करणेत येईल.

- घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरातील सर्व कचरा एकाच घनकचरा प्रकल्प केंद्रस्थळी नेण्याऐवजी तो निर्माण होतो त्याच विभागामध्ये त्याच्यावर प्रक्रिया झाल्यास कचरा वाहतूक खर्चामध्ये बचत

होईल शिवाय कचरा विल्हेवाटीतून निर्माण होणारे खत त्या ठिकाणीच वापरता येईल. याकरीता विविध सोसायट्यांना,संस्थांना,हॉटेल्सना,शाळा महाविद्यालयांना प्रोत्साहित करण्यात येईल व त्यांना असे प्रकल्प उभारणीसाठी सुयोग्य मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात येईल.

- आधुनिक व धार्मिक शहर म्हणून ओळखले जाणारे नाशिक शहर स्वच्छ व सुंदर असावे याकरिता कचरा संकलन,वाहतुक व विल्हेवाट या तिन्ही बाबींकडे विशेष लक्ष देत नागरिकांचा सक्रीय सहभाग यामध्ये अनिवार्य आहे.

- पुढील काळामध्ये ओल्या व सुक्या कचऱ्याबरोबरच,इलेक्ट्रॉनिक कचरा वर्गीकरण करणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक कचरा निर्माण होतो त्या ठिकाणीच वेगळा ठेवणे व महानगरपालिकेने तो स्वतंत्ररित्या संकलित करणे याकरीता योग्य ती पावले उचलण्यात येत आहेत.

- शहर स्वच्छतेच्या दृष्टीने शहरातील मुख्य ठिकाणी रस्त्यांच्या कडेला "लिटर बिन" लावण्यास सुरवात झाली आहे. त्याच बरोबर शहर बीन फ्री करण्याच्या दष्ट्रीकोनातुन वाटचाल करण्यात येत आहे. घनकचरा संकलन व वाहतुक यासाठी सन 2018-2019 चे अंदाजपत्रकात सुमारे 41 कोटी रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे. सदरची तरतुद ही मागील वर्षाच्या तुलनेत रु.3.00 कोटीने वाढ केलेली आहे.

## घनकचरा प्रक्रिया

- शहरात संकलित केलेल्या घनकचऱ्यावर मनपाचे कचरा प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करुन त्यापासुन खत बनविण्यात येते. तसेच कचऱ्यातील प्लॅस्टीक पासुन इंधन तयार करण्यासाठी चार मेट्रीक टन क्षमतेचा प्लॅन्ट कार्यान्वीत करण्यात येत आहे. तसेच पर्यावरणाच्या दृष्ट्रीने जुन्या लॅन्डफिल शास्त्रोक्त पध्दतीने कॅपींग करणेत येणार आहे. तसेच हॉटेल मधील ओला कचरा व मलजलावर प्रक्रिया करुन विज निर्मिती करण्याचा प्रकल्प कार्यान्वीत करण्यात येईल. सदर कामांसाठी सन 2018-2019 चे अंदाजपत्रकात सुमारे १४.८३ कोटी ची तरतुद करण्यात आलेली असुन मागील वर्षापेक्षा रु.2.71 कोटीने सदरची तरतुद जास्त आहे.

## ➤ स्वच्छ भारत अभियान

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत निर्माण करण्यासाठी शासनाने स्वच्छ भारत अभियान सुरु केले आहे.त्याचाच भाग म्हणून नाशिक महानगरपालिकेने स्वच्छ व सुंदर नाशिक अभियान हाती घेतले आहे.त्यामध्ये वैयक्तिक व सार्वजनिक जीवनामध्ये स्वच्छता वाढविणे गरजेचे आहे.ज्यामध्ये वैयक्तिक स्वच्छता,घरामधील स्वच्छता तसेच शाळा,महाविद्यालये,संस्था, कार्यालये, मार्केट,सार्वजनिक ठिकाणे अशा सर्वच ठिकाणी स्वच्छता राखणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे.त्यादृष्टीने स्वच्छता संस्कृती वाढविण्याची गरज आहे.

- "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत नविन सामुदायिक शौचालये व घरगुती शौचालये उभारुन तसेच सदयस्थितीत उपलब्ध असलेली शौचालये दुरुस्त करुन,नाशिक शहर हागणदारीमुक्त (ओ.डी.फ्री) करण्यात आले आहे.

- श्री.चिन्मय उद्गीरकर (अभिनेता),कविताताई राऊत (क्रिडा धावपटू),श्री.प्रसाद पवार (छायाचित्रकार),श्री.अशोक दुधारे (तलवारपटू),श्री.प्रफुल्ल सावंत,श्री.राजेश सावंत (चित्रकला), डॉ.हितेंद्र महाजन (क्रिडा (सायकलपटू),डॉ.महेंद्र महाजन (क्रिडा (सायकलपटू) यांची नाशिक महानगरपालिकेचे "स्वच्छता ब्रॅन्ड ऍम्बेसेडर" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

- अभियानांतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व प्रभाग टप्प्याटप्प्याने हागणदारी मुक्त जाहीर करण्यात आले आहेत. "स्वच्छ भारत मिशन" अंतर्गत Quality Council of India यांच्या समितीमार्फत महानगरपालिका क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आले असून महानगरपालिका क्षेत्र हागणदारीमुक्त असल्याचे त्यांनी प्रमाणित केले आहे व याबाबत राज्य शासनाच्या समिती मार्फतही पाहणी करण्यात आली असून मा.राज्य शासनाने शहर हागणदारीमुक्त घोषित केले आहे.
- तसेच IHHL अंतर्गत एकूण 7264 एवढे वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली आहेत. सन 2018-2019 या वर्षात रु.2.25 कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

## ➢ पाणी पुरवठा :-

- नाशिक शहरासाठी गंगापुर धरणातुन सुमारे 90 टक्के व दारणा नदीवरील चेहडी बंधा-यातुन सुमारे 10 टक्के कच्चे पाणी (प्रक्रीया न केलेले) उचलण्यात येते व ते पुढे शहरात विविध ठिकाणी असलेल्या सहा जलशुध्दीकरण केंद्रात घेवुन त्यावर प्रक्रीया करण्यात येते. प्रक्रीया केलेले पाणी सम्प पम्प /एम.बी.आर.मार्फत ई.एस.आर.मध्ये घेतले जाते व पुढे ई.एस.आर मधुन जलवितरण वाहिन्याद्वारे नागरिकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदय: स्थितीत 6 जलशुध्दीकरण केंद्र,6एम.बी.आर.व 97 ई.एस.आर./जी.एस.आर.द्वारे सुमारे 1800 कि.मी.जलवितरण वाहिन्या वरुन पाणी वितरण करण्यात येत आहे.
- नाशिक शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन पाण्याचा तिसरा स्त्रोत म्हणुन मुकणे धरणातुन पाणी पुरवठा करणेसाठी मुकणे पाणी पुरवठा योजनेचे काम जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सुरु असुन योजनेचे काम या वर्षात पुर्ण होवुन शहरासाठी पाणी उपलब्ध होवु शकेल.
- शहरासाठी वर नमुद केलेले तीनही स्त्रोत महानगरपालिकेसाठी उपलब्ध होत असुन शहरात बऱ्याच ठिकाणी कमी प्रमाणात पाणी येणे अथवा कमी दाबाने पाणी येणे अशा तक्रारी वारंवार येत असतात त्यामुळे पाणी पुरवठयात सुधारणा होणेसाठी वितरण व्यवस्था (Distribution System) सुधारणे करीता उपाययोजना कराव्या लागणार आहेत. महानगरपालिकेने सल्लागार नेमुन वॉटर ऑडीट करुन घेतलेले असुन वॉटर ऑडीट अहवालानुसार 44 टक्के पेक्षा जास्त हिशोब बाहय पाणी (NRW) असल्याचे आढळुन आले आहे.
- पाणी पुरवठा प्रणालीचे सर्वसाधारणपणे तीन भाग आहेत. त्यातील एक भाग उगम स्त्रोत (Source), दुसरा वितरण व्यवस्था ज्यामध्ये Transportation म्हणजे गंगापूर धरणापासुन जलशुध्दीकरण केंद्र व त्यापासुन एम.बी.आर पर्यंत असलेली पाणी पुरवठा यंत्रणा व तिसरा भाग Distribution म्हणजेच ई.एस.आर. ते पाणी प्रत्यक्ष वापरणारा नागरिक.
- पाणी पुरवठा व्यवस्था ही "Catchment to Consumer" या तत्वावर आधारीत असणे अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत या तीनही भागांसाठी स्काडा (SCADA) यंत्रणा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे तीनही भागांमध्येही स्काडा यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे.याद्वारे धरण ते प्रत्यक्ष पाणी वापरणारा नागरिक म्हणजेच ग्राहक (Consumer) इथपर्यंतचा पाण्याचा प्रवास व त्याचा पूर्ण हिशोब ठेवणे शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे पाणी गळती थांबवून पाण्याचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्व माहिती सहज उपलब्ध होईल. त्यासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत पॅनसिटी प्रकल्पात शहरातील धरण ते नागरिक या संपूर्ण पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी स्काडा प्रणाली बसविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे

शहरात सदय: स्थितीत ग्राहकांनी बसलिलेले पाण्याचे मिटर हे मॅकेनिकल बी टाईप मिटर्स असुन सदर मिटर लवकर नादुरुस्त होतात त्यामुळे पाण्याची बिलींग करतांना अडचणी येतात व नागरिकांना चुकीची बिल आकरणी होते त्यामुळे जितके पाणी वापरले तितक्या पाण्याची आकारणी होत नाही व महापालिकेचा महसुलावर विपरीत परिणाम होतो त्यामुळे पाणी पुरवठा व्यवस्था तोटयात येत आहे.यासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील सर्व नळ जोडण्यांना AMR सुविधेसह जलमापके बसविण्यात येणार आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत SCADA व Automatic Meter Reading (AMR) सुविधेस जलमापक बसविणेसाठी र.रु.249 कोटीची तरतुद स्मार्ट सिटी अंतर्गत करण्यात आली आहे.

- नाशिक शहरातील गावठाण भागात असमान पाणी पुरवठा होत आहे. तसेच तेथील जलवाहीन्या अतिशय जुन्या झाल्या असल्यामुळे पाणी गळती व दुषित पाण्याच्या समस्या उदभवतात. गावठाण भागातील ग्राहकांना 24X7 पाणी पुरवठा करण्याची योजना स्मार्ट सिटी अंतर्गत राबविणेत येत आहे. यात जुन्या व खराब झालेल्या जलवाहीन्या काढुन त्याजागी सुमारे 101 कि.मी. लांबीच्या नविन जलवाहीन्या टाकण्यात येणार आहे व 3 नविन जलकुंभ बांधुन त्यादवारे 24X7 पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.स्मार्ट सिटी अंतर्गत Area Base Development (ABD) व ग्रीन फिल्ड भागासाठी र.रु.50.65 कोटी खर्चाची स्मार्ट सिटी अंतर्गत तरतुद करण्यात आली आहे. सदर 24X7 पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर 24X7 पाणी पुरवठा केल्यामुळे जलवितरण करतांना जलवाहीन्यां वरील पाण्याचा दाब समान राहील त्यामुळे जलवितरणात अडथळा होणे, गळती होणे आणि त्यामुळे सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळून साथीचे आजार होणे आरोग्यास धोका निर्माण होणे या सर्व बाबी टाळल्या जातील तसेच जलवितरणाचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.त्याचप्रमाणे ग्राहकांसाठी Sump,Pump,Tank आणि R.O.System (घरातील पाणी फिल्टर करण्याची यंत्रणा) साठी लागणारा खर्च कमी होईल.त्यामुळे 24X7 पाणी पुरवठा सुरु झाल्यास भविष्यात महानगरपालिकेच्या खर्चात बचत होऊन नागरिकांना आरोग्यदायी जीवन लाभण्यास व त्यांची क्रयशक्ती वाढण्यास मदत होणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्यानंतर भविष्यात संपुर्ण शहरात नागरिकांना 24X7 पाणी पुरवठा करण्याचा मानस आहे.
- जलबचतीच्या दुष्टीने अनाधिकृत नळजोडण्या खंडीत करावयाची धडक कारवाई हाती घेण्यात येऊन अनाधिकृत नळ जोडण्या खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
- तसेच शहरातील नविन विकसित होणा-या परिसरातील नागरीकांना पाणी पुरवठा करणेसाठी वितरण व्यवस्थेतील जलकुंभाची व वितरण वाहिन्या टाकण्यांची सुरु असलेली कामे पुर्ण करण्यासाठी तसेच जो नविन भाग विकासित झाला आहे व त्या भागात वितरण वाहीन्या नाहीत अशा भागात सुमारे 102 कि.मी. लांबीच्या नविन वितरण जलवाहीन्या टाकण्याचे व ज्या ठिकाणी जुन्या वितरीका बदलणे व अत्यावश्यक कामे करणेसाठी पाणी पुरवठा विभागा करिता आस्थापनासह महसुली व भांडवली कामांसाठी एकुण सन 2018-19 या वर्षासाठी रु.१७६.९३ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत रु.38.11 कोटीने वाढ करण्यात आली आहे. भांडवली कामांसाठी रु.96.86 कोटी रुपये तरतुद केली असुन वित्तीय वर्ष 2017-2018 पेक्षा रु.36.99 कोटीने जास्त तरतुद केलेली आहे. भांडवली कामांसाठी एकुण 61.78 टक्के वृध्दी करण्यात आली आहे.

## ➢ मलनि:सारण /सांडपाणी व्यवस्थापन

- नाशिक महानगरपालिकेने संपुर्ण शहरासाठी सर्वंकष असा मलनि:सारण व्यवस्थापन आराखडा तयार केला आहे. सदर आराखडयाप्रमाणे नाशिक महानगरपालिका क्षेत्र आठ सिवरेज झोनमध्ये विभागण्यात आले आहे.सदर आठ सिवरेज झोन पैकी चार सिवरेज झोनमध्ये मलनि:सारण केंद्र कार्यान्वीत करण्यात आली आहेत व त्याची सद्यस्थितीत स्थापीत क्षमता ३४२.५० MLD आहे, उर्वरीत चार सिवरेज झोन पैकी गंगापुर मध्ये १८ MLD क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधकामासाठी रु.28.89 कोटी तसेच पिंपळगांव खांब येथे ३२ MLD क्षमतेचे मलनि:सारण केंद्रासाठी 55.58 कोटी असे एकुण 84.47 कोटी मंजुर झाले असुन काम प्रगती पथावर आहे व सदर काम सन 2018-2019 मध्ये पुर्ण करण्याचा मानस आहे.
- उर्वरीत दोन सिवरेज झोन मखमलाबाद व कामटवाडे हे सन २०२१ नंतर विकसीत होणे अपेक्षीत आहे.
- संपुर्ण शहरामध्ये सुमारे १५८४ कि.मी.लांबीच्या मलवाहिकाद्वारे सांडपाणी संकलीत करुन सुमारे २८० MLD मलजल मलनि:सारण केंद्रात प्रक्रियेसाठी आणण्यात येते व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे तत्कालीन मंजुर मापदंडानुसार प्रक्रिया करुन प्रक्रियायुक्त सांडपाणी नदीपात्रामध्ये सोडण्यात येते. शहरामधील 100 टक्के सिवेज कलेक्ट करुन प्रोसिसींग करण्याच्या दृष्ट्रीकोनातुन नियोजन केले आहे.
- नाशिक महानगरपालिकेच्या हददीतील गोदावरी नदी व तिच्या उपनद्या प्रदुषण मुक्त करणे कामी PIL 176/2012 मा.उच्च न्यायालयात दाखल आहे. सदर PIL मध्ये मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशा नुसार नदी प्रदुषण मुक्त करणेसाठी NEERI संस्थे मार्फत उपाय योजना व पर्याय सुचविण्यात आले आहेत. त्यानुसार ज्या विकसीत भागात मलवाहिकांचे जाळे नाही त्या भागात मलवाहिका तातडीने टाकणे गरजेचे आहे.तसेच अस्तित्वातील मलनि:सारण केंद्राचे (Sewage Treatment Plant) प्रक्रियायुक्त सांडपाणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या सुधारीत मापदंडा नुसार नदीपात्रात सोडणे आवश्यक असल्या कारणाने सदरच्या मलनि:सारण केंद्राचे (STP) आधुनिकीकरण (Upgradation & Retrofitting) करणे आवश्यक आहे.
- सदरच्या कामांकरीता शासनाकडे “अमृत” योजने अंतर्गत निधी उपलब्धतेसाठी मागणी केलेली आहे. सद्यस्थितीत प्रस्तावित मलवाहिकांचे जाळे (Network) तयार करणेकामी “अमृत” अंतर्गत सादर केलेले र.रु.९२ कोटीचे प्रस्तावास शासनाने सदर कामे तातडीचे असल्यास मनपा निधीतून राबविणेस कळविले आहे.
- मा.उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेता अमृत योजने अंतर्गत निधी मंजुर होईल या अपेक्षेवर सद्यस्थितीत मनपा निधी मधुन ज्या भागात मलवाहिका नाहीत त्या भागात मलवाहिकांचे जाळे टाकणेची कामे तातडीने हाती घेणे गरजेचे आहे. त्यामुळे गोदावरी व तिच्या उपनद्यांचे प्रदुषण टाळणे व मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन करणे शक्य होईल.
- अस्तित्वातील मलनि:सारण केंद्रे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नविन /सुधारीत मापदंडानुसार SBR(Sequential Batch Reactor) या अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार आधुनिकिकरण (Upgradation & Retrofitting) करणे आवश्यक आहे.

- याकरीता मलनि:सारण विभागा मार्फत आवश्यक भागात मलवाहिकांचे जाळे टाकणे व अस्तित्वातील STP चे सुधारीत मापदंडानुसार आधुनिकीकरण करणे गरजेचे असल्याने मलनि:सारण विभागा करीता आस्थापनासह महसुली व भांडवली कामांसाठी एकुण सन 2018-2019 मध्ये सुमारे १४४.३३ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत रु.104.45 कोटी इतकी वाढ केलेली आहे. सदरची वाढ 261.91 टक्के एवढी वाढविली आहे. भांडवली खर्चासाठी रु.105.25 कोटी इतकी तरतुद केली असुन मागील वित्तीय वर्षापेक्षा रु.97.29 कोटी इतकी जादा तरतुद करण्यात आली आहे.

## ➢ <u>सार्वजनिक विद्युत व्यवस्था ( Street Light /Public Light )</u>

- विद्युत विभागांतर्गत नागरिकांना पुरविण्यात येणा-या सार्वजनिक खांबा वरील विद्युत सेवेमध्ये सुधारणा करणे, त्या अत्याधुनिक करणे, सार्वजनिक विद्युत खांबांवरची सेवा उपलब्ध नाही तेथे ती उपलब्ध करुन देणे आदी कामे प्रस्तावित आहेत.

- दिवाबत्ती सुधारणे अंतर्गत एकूण ११५२५ एल.ई.डी.दिवे बसवून पथदिव्यांची सुधारणा करण्यात आली आहे. तसेच उर्जाबचत सुध्दा साध्य झाली आहे.

- त्याचप्रमाणे वीज बचतीच्या दृष्टीने सद्यस्थितीतील दिवे बदलून स्मार्ट स्ट्रीट लाईट सिस्टीम कार्यान्वीत करणेसाठीचा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभागातुन (PPP) राबविण्याचा मानस आहे. यामुळे विज बचत होऊन वीजसेवेमध्येही सुधारणा होऊन देखभाल दुरुस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे. याशिवाय सदर प्रकल्पामधुन महानगरपालिकेस काही प्रमाणात उत्पन्नही प्राप्त होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प PPP तत्वावर राबविणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यामध्ये अत्याधुनिक CCMS/SCADA प्रणाली वापरणेत येणार असल्याने सर्व गोष्टी पारदर्शकपणे व मानवी हस्तक्षेपाशिवाय पार पाडणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे लाईट चालु व बंद करण्याच्या वेळानिर्धारण करणे व नादुरुस्त झालेले पथदीप दुरुस्त करणेबाबत रिअल टाईम माहीती उपलब्ध होऊन नागरीकांना वेळीच दर्जेदार सेवा उपलब्ध होतील. सदर प्रकल्पा अंतर्गत शहरातील सर्व स्ट्रीट लाईट या स्मार्ट स्ट्रीट लाईट मध्ये रुपांतरीत करण्यात येणार आहे.

- नाशिक शहराच्या काही भागांमध्ये अजूनही रस्त्यांवर दिवाबत्तीचे खांब नाहीत तसेच काही ठिकाणी विद्युत खांबांच्या सलगतेमध्ये खंड पडलेला आहे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी खांब आहेत मात्र त्यावर विद्युत फिटींग्ज नाहीत अथवा चालू स्थितीत नाहीत. सन 2018-2019 या वर्षात 3750 विद्युत पोलची उभारणी करण्यात येणार आहे. त्याकरीता 2018-2019 मध्ये सुमारे 10 कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

- सन २०१७-१८ मध्ये दिवाबत्ती उपलब्ध नसलेल्या ठिकाणी नविन पथदिवे लावण्यात येत आहेत.

- नाशिक रोड नविन हॉस्पीटल इमारत येथील विद्युतीकरणाचे काम सुरू आहे.

- नाशिक मनपा मार्फत शहरात विविध चौकांमध्ये ३७ ठिकाणी स्वयंचलीत ट्रॅफीक सिग्नल कार्यन्वित आहेत.

- नाशिक महानगरपालिकेचे रूग्णालय,विभागीय कार्यालय नविन नाशिक व नाशिक पश्चिम या ठिकाणी नविन उद्ववाहन लावणे तसेच मुख्य कार्यालय येथील उद्ववाहन बदलणेचे काम व अंतर्गत विद्युतीकरण सुधारणा करणेत येत आहे.

- सातपुर येथील पपया नर्सरी,नाशिक पश्चिम कॉलेजरोड वरील कुलकर्णी चौक,सप्तरंग चौक,आणि शरणपुर रोड वरील एचडीएफसी चौक या चौकामध्ये स्वयंचलीत ट्रॅफीक सिग्नल कार्यान्वीत करणेचे काम प्रस्तावीत आहे. वित्तीय वर्ष सन 2017 मध्ये या विभागासाठी एकुण तरतुद रु.50.65 कोटी होती. त्यामध्ये र.रु.7.71 कोटी इतकी वाढ करुन वित्तीय वर्ष 2018-2019 मध्ये रु.58.36 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. यापैंकी भांडवली खर्चासाठी रु.12.01 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. मागील वित्तीय वर्षापेक्षा रु.2.71 कोटी इतकी अधिक तरतुद करण्यात आली आहे.

## ➢ उद्यान विभाग :-

- नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सन 2016-17 व 2017-18 मध्ये केंद्र शासन व राज्य शासन व नाशिक महानगरपालिका यांच्या एकत्रित अनुदानातुन मखमलाबाद शिवारातील स.नं.400 या आरक्षित 17.5 एकर जागेत वन उद्यान विकसित करण्याचे काम चालु आहे. सदरहु जागा महाराष्ट्र गुजरात महामार्गावर असुन येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिक नागरिकांना सदरचे वन उद्यान एक दिवशीय सहली करीता आर्कषणाचा केंद्र बिंदु ठरणार आहे. सदर वन उद्यानात 11 हजार भारतीय प्रजातीच्या झाडांची,फळ झाडांची व इतर शोभिवंत फुल झाडांची लागवड करण्यात येत आहे.तसेच नागरिकांना बसण्यासाठी पॅगोडा, आकर्षक आसन व्यवस्था,प्रशस्त लॉन प्लॉट व लहान मुलांना खेळण्यासाठी मैदाने विकसित करण्यात येणार आहे. सदरचे काम सन 2018-2019 या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

- नाशिक मनपा कार्यक्षेत्रात एकुण 481 उद्याने असुन त्यापैकी 286 उद्याने निविदा पध्दतीने खाजगी मक्तेदारांमार्फत 3 वर्ष कालावधीकरीता दैनंदिन देखभालीसाठी देण्यात आलेली आहे. सदर कामाचा 1 वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असुन माहे डिसेंबर 2019 पावेतो देखभालीसाठी देण्यात आलेली आहे.  उर्वरित उद्यानांची देखभाल मनपामार्फत करण्यात येत आहे.

- नाशिक मनपा क्षेत्रातील सहा प्रशासकीय विभागामध्ये उद्यान प्रयोजनासाठी नव्याने हस्तांतरीत झालेल्या भुखंडावर आवशक्तेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार विविध ठिकाणी उद्याने विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आलेले असुन अशी सर्व कामे या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.सदर उद्याने विकसित करतांना विविध प्रकारची थीम मांडुन थीम पार्क विकसित करण्याचा मनोदय आहे.त्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना,लहान मुलांना उद्यानांची सोय होणार आहे.

- नाशिक मनपा कार्यक्षेत्रात महाराष्ट्र झाडांचे संरक्षण, जतन अधिनियम 1975 च्या तरतुदीनुसार व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार संगणकीय प्रणालीद्वारे शहरातील अस्तित्वात असलेल्या सर्व वृक्षांची गणना करण्याचे काम सुरु करण्यात आलेले असुन सदरच्या कामात एकुण 25 लक्ष वृक्ष गणनेचे उदिष्ट प्राकलनात धरण्यात आलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात गणना करतेवेळी शहरातील वृक्षांची संख्या ही मोठया प्रमाणात वाढलेली असुन वृक्ष गणना ही साधारणपणे 43.5 लक्ष पावेतो होण्याची शक्यता आहे. वृक्ष गणनेचे काम हया वर्षात पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

- नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन 2017 या कालावधीत भारतीय प्रजातीची सुमारे 10 फुट उंचीची एकुण 21000 नग वृक्ष लागवड पुर्ण करण्यात आली असुन त्या वृक्ष लागवडीची  देखभाल अनुक्रमे 1 वर्ष व 5 वर्ष या कालावधीकरीताचे नियोजन केलेले आहे.

- नाशिक मनपा क्षेत्रातील पांडवलेणेच्या लगतचे वन विभागाचे 35 एकर क्षेत्रातील पंडित जवाहरलाल नेहरु वन उद्यान सि.एस.आर.तत्वावर नाशिक महानगरपालिकेने टाटा ट्रस्ट या प्रायोजकां मार्फत विकसित केले असुन तेथे विविध उद्याने व लेझर शो विकसित करण्यात आलेला आहे.

- उद्यान विकास भांडवली कामे या साठी सन 2018-2019 चे अंदाजपत्रकात रु.13.50 कोटी एवढया रकमेची तरतुद करण्यात आलेली आहे. मागीलवित्तीय वर्षाच्या तुलनेत रु.9.51 कोटी इतकी वाढ करण्यात आलेली आहे. उद्यान विभागासाठी वित्तीय वर्षे 2018-2019 मध्ये एकुण 26.32 कोटी करण्यात आली असुन वित्तीय वर्ष सन 2017-2018 च्या तुलनेत 53.22 टक्के वाढ करण्यात आली आहे.

## ➢ वृक्ष निधी अंदाजपत्रक

- महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या अंतर्गत प्रतिवर्षी वृक्षनिधीचे अंदाजपत्रक करण्यात येत असुन अंदाजपत्रकात एकत्रित कराबरोबर जो वृक्षकर संकलित केला जातो ती रक्कम 187.00 लक्ष आणि सुरुवातीची शिल्लकेसह व मनपा हिस्सासह र.रु.589 लक्ष अर्थसंकल्प तयार केलेला असुन त्यास वृक्ष संवर्धन, नवीन वृक्षलागवड इत्यादी साठी तरतुद केलेली आहे.

## ➢ वैद्यकिय विभाग

- नाशिक महानगरपालिकेत वैद्यकिय विभागाअंतर्गत 4 मोठी रुग्णालये, 30 शहरी प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र कार्यरत आहेत. बिटको रुग्णालय, डॉ झाकिर हुसेन रुग्णालय, इंदिरागांधी रुग्णालय, श्री स्वामी समर्थ रुग्णालय, 4 मोठया रुग्णांलयांमध्ये ऑपरेशन थिएटर्स व सर्व प्रकारच्या छोटया मोठया शस्त्रक्रिया होतात. बिटको रुग्णालयात स्वतंत्र आय.सी.यु.वॉर्ड अतिगंभीर ह्दयविकारासाठी कार्यरत आहे. तसेच स्वतंत्र जळित कक्ष, नवजात शिशु,अतिदक्षता विभाग, स्त्री पुरुष जनरल वैद्यकिय विभाग अशा विविध प्रकारच्या सुविधा अल्पदरात तसेच मोफत ही पुरविल्या जातात.इतर 3 रुग्णालयात स्त्री व पुरुष जनरल वैद्यकिय विभाग,प्रसुतिविभाग व बाहय रुग्ण विभाग कार्यरत आहेत. तसेच 30 शहरी आरोग्य केंद्रांमार्फत कुंटुब कल्याण कार्यक्रम राबविण्यात येऊन मनपा कार्यक्षेत्रात कुंटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्व खाजगी डॉक्टरांनी कुंटुंब कल्याण शस्त्रक्रियाचे काम वाढविणेकामी सुचित करण्यात येते त्याचप्रमाणे लसिकरण व माता बाल संगोपन या अंतर्गत बि.सी.जी,डी.पी.टी,पोलिओ,पेन्टाव्हॅलंट,गोवर,डी.टी.टी.टी इ. विविध प्रकारच्या लसी 30 शहरी आरोग्य केंद्रामार्फत मोफत दिल्या जातात.

- वैद्यकिय विभागाच्या प्रयोगशाळेत ज्या रक्ताच्या चाचण्या होत नाही अशाप्रकारच्या 321 वेगवेगळया रक्ताच्या चाचण्या बाजारा भावापेक्षा कमी किंमतीत Outsourcing च्या माध्यमातुन मनपाच्या इमारतीत पी.पी.पी. तत्वावर लोकांना स्वस्त दरात उच्च चाचण्या करण्याचे नियोजन आहे. तरी या पोटी नविन मशिन घेणे.तसेच आस्थापना खर्च व दैनंदिन देखभाल खर्चात बचत होणार आहे. नागरिकांना सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

- दोन शहरी आरोग्य केंद्र नविन बांधलेले आहेत. यासह वैदकिय विभागासाठी नवीन अद्यावत मशिनरी व इतर भांडवली कामे यासाठी सन 2018-19 मध्ये रु.11.50 कोटी तरतुद करण्यात आली आहे. वित्तीय वर्ष 2017-2018 मध्ये रु.1.01 कोटी तरतुद धरण्यात आली होती. त्यात 10.59 कोटीची भरीव वाढ करण्यात आली आहे.

- शहरात डेंग्यु,स्वाईन फल्यु,चिकनगुनिया या रोगांचे निदान होणे मनपा मार्फत आवश्यक मॉडीक्युलर डिजीटल लॅबोरेटरीच्या सुविधा असणे आवश्यक आहे. नाशिक शहरात ही सुविधा नसल्याने नागरिकांना या रोगांचे निदान करणेसाठी पुणे/मुंबई येथे जावे लागते. यामुळे रोग निदान न झाल्यामुळे 3 ते 10 टक्के रुग्ण दगावतात ते प्रमाण या सुविधा पुरविल्यास कमी होईल.

- जेडीसी बिटको रुग्णालय या ठिकाणी एम.आर.आय.मशिन,सी.टी स्कॅन मशिन,डिजीटल एक्स-रे, अद्यावत प्रयोगशाळा,इ.योजना कार्यवाहीत आहे.सदर कामकाजाकरीता कुंभमेळा सन 2015-2016 मध्ये रु.23 कोटी एवढया रक्कमेस शासन मान्यता आहे त्या निधीचा वापर सन 2018-2019 मध्ये एम.आर.आय.मशिन,सी.टी स्कॅन मशिन,डिजीटल एक्स-रे, या मशीनरी खरेदी करुन कार्यान्वीत करुन नागरीकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

- वैद्यकिय विभाग मार्फत जेडीसी बिटको या ठिकाणी नव्याने सीपीएस कॉलेज सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे वैद्यकिय विभागाला निवासी वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होतील.

- मुंबई शुश्रुषागृह अधिनियम 1949 कायदा अंतर्गत नर्सिंग होम रजिस्ट्रेशन महानगरपालिका क्षेत्रात लागु केला असुन त्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी/ट्रस्टच्या मालकीची शुश्रुषागृहे व प्रसुतिगृहे यांना नोंदणी तसेच दर 3 वर्षाने माहे एप्रिल मध्ये नुतणीकरण करणे कायदयाने बंधनकारक करण्यात आलेले आहे. सदर कायदयाचे पालन न केलेस संबंधीत हॉस्पीटल विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.20 सप्टेंबर 1994 पासुन देश भर निदान तंत्रे अधिनियम लागु केला आहे याच अधिनियमात 2003 साली सुधारणा करुन गर्भधारणा पुर्व व प्रसुतिपुर्व निदान तंत्रे अधिनियम 2003 लागु करण्यात आलेला आहे.लिंगभेद चाचण्या करण्यास सदर कायदयाने प्रतिबंध असुन या चाचण्या स्त्री भुण हत्या करिता रुपये 10,000/ दंड व 3 वर्षाच्या सक्षम कारावासाची शिक्षा आहे.

- वैद्यकीय विभागासाठी आस्थापनासह महसुली व भांडवली कामांसाठी एकुण 55.58 कोटी इतकी अर्थ संकल्पीय तरतुद सन 2018-2019 करीता करण्यात आलेली आहे. मागील वित्तीय वर्षापेक्षा रु.17.00 कोटी इतकी अधिक तरतुद करण्यात आली आहे. सदरची वाढ ही मागील वर्षाच्या तरतुदी पेक्षा 44.07 टक्के इतकी जास्त आहे.या शिवाय एन.यु.एच.एम. अंतर्गत अधिकचा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## ➢ शिक्षण विभाग

- शाश्वत विकासाचे ध्येय म्हणजे सर्वांना शिक्षण. त्यास अनुसरून शिक्षणाचा उदेश पुस्तिका ज्ञान मिळविणे एवढेच नसून प्राप्त असलेल्या ज्ञानाचे उपयोजन करून सक्षम व सूदृढ नागरिक घडविणे हे आहे.हे उदिष्ट डोळयासमोर ठेवून विदयार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण विभाग कार्यरत आहे.

- सन 2017-18 पर्यत महानगरपालिकच्या सर्व शाळांमध्ये मुलभुत सोयी सुविधा अदयावत करण्याचा प्रयत्् करण्यात आला असून कमी विद्यार्थी संख्येच्या 2 शाळा एकत्र करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे विद्यार्थी उपस्थिती वर सकारात्मक परिणाम झालेला आहे. शालेय इमारती नसलेल्या एकूण 4 शाळांसाठी इमारत बांधकाम करणे प्रस्तावित असून या माध्यमातुन सर्व शाळांना आवश्यक वर्गखोल्या उपलब्ध होतील.या व्यतिरिक्त सर्व शाळांना आवश्यक ते स्वचछतागृहे पुरविणेबाबत

तरतूद करणेत आलेली आहे. सन 2018-2019 या वर्षाकरीता अंदाजपत्रकात सुमारे रु.4 कोटी इतकी तरतुद नवीन माध्यमिक शाळा इमारत बांधणेकरीता करण्यात आलेली आहे.

- **डीजीटल लर्निग-** मनपाच्या 126 प्राथमिक आणि 13 माध्यमिक शाळा हया 86 इमारतीत कार्यारत आहेत. सदर शाळांमध्ये प्रत्येकी किमान 1 डिजीटल क्लास रुम आहे. 864 वर्गांपैकी 127 मनपाचे माध्यमातुन व अंदाजे 118 क्लासरुम सामाजिक लोक सहभागातुन डिजीटलाईज करण्यात आल्या आहेत. उर्वरीत सर्व वर्ग डिजीटलाईज करण्यासाठी **सन 2018-19 च्या अंदाजपत्रकात 11 कोटी रुपये इतकी** तरतुद करण्यात आली असुन प्रथमत: इतकी मोठी तरतुद या प्रयोजनासाठी करण्यात येत आहे. या अंतर्गत मनपाच्या सर्व शाळा डिजीटाईज करण्यात येणार असुन यामुळे गुणवत्तापुर्वक शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.
- महानगरपालिकच्या शाळांतील विदयार्थ्यांकरिता क्रिडा संस्कृती व संघ भावना वाढीस लागावी म्हणून मनपाच्या शाळांमध्ये असलेली क्रिडांगणे विकसीत करून त्यावर आवश्यक क्रिडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.
- विद्यार्थ्यांना विज्ञान साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्ट्रीने सीएसआर च्या माध्यमातुन 3.09 कोटी इतका खर्च सन 2017-2018 मध्ये करण्यात आला आहे.
- शालेय अध्ययन प्रभावी व फलदायी व्हावे व आधुनिक तंत्रज्ञान युगाशी सुसंगत असावे या करिता मनपा शाळा क्र. 16 येथे मध्यवर्ती व्हर्च्यूवल क्लासरूम उभारण्यात आलेली आहे. हया क्लासरूमशी 6 विभागातील प्रत्येकी 1 शाळा जोडण्याचे काम सुरू आहे. या शाळांमध्ये उत्कृष्ट स्त्रोत वापरून विविध संकल्पनांचा समावेश करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करण्याचे नियोजन आहे.
- शाळांमध्ये ज्ञानरचना वादावर आधारित अध्ययन व अध्यापन प्रक्रिया प्रभावी व्हावी या करिता महानगरपालिका स्तरावर शिक्षकांचे कृतीयुक्त प्रशिक्षण आयोजीत करण्यात येत आहे. शासनाच्या महत्वकांक्षी अशा प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत 25 निकषानुसार मनपाच्या 86 शाळां प्रगत झालेल्या असुन उर्वरित 40 शाळा येत्या शैक्षणिक वर्षात प्रगत करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.
- केद्रशासनाच्या 15 कलमी योजनांपैकी सर्व शिक्षा अभियान या योजनेसाठी सन 2017-18 अंतर्गत 659.90 लक्ष रू. तरतूद मंजूर असून प्रभावी पणे अंमलबजावणी सुरू आहे.
- शिक्षणाच्या माध्यमातुन भारताचे भावी नागरीक घडविणे हे आपले सर्वाचे दायीत्व आहे. त्याकरीता लाईफ स्कील्स आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याकरीता सन 2018-2019 या वर्षात नाशिक मनपा अंतर्गत सर्व शाळांमध्ये (प्रायव्हेट स्कुल सहीत) नाविन्य पुर्ण प्रोजेक्ट घेण्यात येत आहे. "Cleanliness Soldiers" हा प्रकल्प सर्व शाळांना सक्तीचा करण्यात येणार असुन त्यात सर्व शाळा व विद्यार्थ्याचा सहभाग आवश्यक असणार आहे.
- मनपाच्या शिक्षण विभागास सन 2018-2019 करीता 64.44 कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली आहे. मागील वित्तीय वर्षामध्ये रु.36.38 कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती. त्यामध्ये रु.28.06 कोटीने अंदाजपत्रकीय तरतुद वाढविण्यात आली असुन सदरची वाढ 77.13 टक्के इतकी आहे.

## ➢ 19 टक्के राखीव बाबी

### महिला व बालकल्याण विभाग

- स्वत:च्या महसुली उत्पन्नातुन मनपाचा बांधील खर्च वजा जाता शिल्लक रकमेवर शासन निर्णयानुसार 5 टक्के राखीव तरतुद महिला व बाल कल्याण विभागासाठी करण्यात आलेली आहे. सन 2018-2019 साठी रक्कम रुपये 19.45 कोटी इतकी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली असुन शासन निर्णयानुसार महिला व बाल कल्याण यांचे अनुज्ञेय बाबींवर नियोजन करुन योग्य रित्या खर्च करण्यात येईल.

### दिव्यांग कल्याण

- वित्तीय वर्ष सन 2018-2019 मध्ये स्वता:चे महसुली उत्पन्नातुन मनपाचा बांधील खर्च वजा जाता शिल्लक रक्कमेवर 3 टक्के राखीव निधीची दिव्यांगासाठी तरतुद करणे आवश्यक आहे. ही रक्कम रु.11.67 कोटी इतकी असुन त्यांचा अंर्तभाव अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे. दिव्यांग कल्याणासाठी सर्वात महत्वाची बाब म्हणजे दिव्यांगाचे अर्ली डिटेक्शन व त्यावर योग्य उपचार वेळीस केल्यास त्याचा सकारात्मक परिणाम होतो. त्याकरीता दिव्यांगासाठी विशेष शाळा/अर्ली डिटेक्शन सेंटर स्थापण करण्याचे प्रयोजन आहे. यामुळे एका छताखाली सर्व प्रकारच्या दिव्यांगाना एका प्रकारची इंटरवेन्शनस मिळू शकतील. दिव्यांगाचा विकास होण्यास यामुळे मदत होईल.
- तसेच सन 2017-18 मध्ये मनपाच्या अंदाजपत्रकीय 3 टक्के अपंग निधीतून दिव्यांग विदयार्थ्यांकरिता शहरात 24 थेरेपी सेंटर स्थापित करणेकामी रू. 182.12 लक्ष निविदा प्रक्रिया सुरू आहे.तसेच दिव्यांग विदयार्थ्यांच्या पॅरा ऑलंपिक स्पर्धा आयोजीत करण्यात येत असून यावर रू.19.00 लक्ष खर्च होणे अपेक्षित आहे.

### क्रीडा विभाग

- उपरोक्त प्रमाणेच 5 टक्के राखीव तरतुद क्रीडा विभागासाठी करण्यात आली असुन एकुण रक्कम रु.19.45 कोटी इतकी तरतुद अर्थ संकल्पात करण्यात आली आहे. क्रीडा पटुना प्रोत्साहन देण्यासाठी चांगल्या दर्जाचे क्रीडांगण तयार करणे व क्रीडा विकसन आराखडा बनविण्याचे कामकाज हाती घेण्याचे योजीले आहे.

### मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना

- समाजातील दुर्बल घटक अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनांसाठी महानगरपालिकेने शासन निर्णय नगरविकास विभाग दि.03 जुलै, 1982 मधील 17 बाबींसाठी 5 टक्के निधी राखुन ठेवणे आवश्यक आहे. वित्तीय वर्ष 2018-2019 मध्ये अर्थसंकल्पात यासाठी रु.19.45 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.
- या शिवाय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी 1 टक्का निधी राखीव ठेवण्यात आला असुन, सन 2018-2019 या वर्षाकरीता र.रु.3.89 कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

## ➢ अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन :-

- नाशिक शहराचे भौगोलिक स्थान/शहरातून वाहणारी गोदावरी नदी व अन्य नद्या या बाबी विचारात घेवून नाशिक शहराचा आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीने आपत्कालिन व्यवस्थापन कृती आराखडा दरवर्षी करणेत येत असतो. त्या दृष्टीने नाशिक शहरातील संभाव्य विविध आपत्तीचे प्रकार,त्यातील धोके समजून घेणे,धोके कमी करण्यासाठी पुर्व नियोजन करणे.अतिसंवेदनशील ठिकाणांबाबत काळजी घेणे व दुर्देवीरित्या आपत्ती ओढवल्यास त्यामधून किमान नुकसान होईल याची दक्षता घेणे,

सदर आपत्तीतून लवकरात लवकर सावरुन जनजीवन व परिस्थिती जलदरित्या सुरळित होईल या दृष्टीने सर्वांगीण विचार करणेत येत आहे.त्यासाठी शहरातील सर्व प्रभागांतील नागरिकांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण घेणेत येत आहे.

- नाशिक मनपा क्षेत्रात गोदावरी,नंदीनी,वालदेवी अशा तीन नद्या वाहत असलेने,दरवर्षी पावसाळयात निर्माण होणारी पुर परिस्थिती,शहरात विविध ठिकाणी साचणा-या पाण्याचा निचरा, तळघरांमधील साचणारे पाणी या बाबींकडे विशेष लक्ष पुरविणेत येत आहे.तसेच शहरातील ड्रेनेज, गटारे,नाले सुस्थितीत ठेवणे यासाठी भर देणेत येत आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत पुर परिस्थिती स्वयंचलित व रियल टाईम माहिती मिळणेसाठी सेन्सर्स बसविले जाणार असुन त्याद्वारे माहिती प्राप्त होऊन वेळीच कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

- नाशिक शहर हे पुरातन शहर असून,गावठांण क्षेत्रामध्ये अतिधोकादायक इमारतींची संख्या मोठी आहे.सदर इमारतींची पडझड होवू नये व जीवीतहानी होवू नये या दृष्टीने पुर्व नियोजनाचा भाग म्हणून अशा अतिधोकादायक इमारतींचे अधिकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर्स कडून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणे व त्यानुसार प्राप्त अहवालानुसार अशा धोकादायक इमारती तात्काळ मोकळया किंवा दुरुस्त करुन घेणे आवश्यक असलेने त्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

- आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीने सिंहस्थ कालावधीमध्ये घेतलेली अद्ययावत यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. त्यामुध्ये प्रामुख्याने इर्मजन्सी रेस्कु व्हॅन, फलड रेस्क्यु व्हॅन, मिनी रेस्कु व्हॅन, OBM (बोट) मशिन्स, श्वसन उपकरण व्हॅन (बी.ए.व्हॅन) इ. चा समावेश आहे.

- अग्निशमन दलाकडील 80% कर्मचारी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित आहेत. अग्निशमन अधिकारी आणि कर्मचारी यांना अत्याधुनिक प्रशिक्षणासाठी नागपूर येथील गृह मंत्रालय, भारत सरकार व्दारा संचलित राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथे प्रशिक्षणासाठी दरवर्षी पाठविण्यात येत आहे.

- महानगरपालिका क्षेत्रात 24 मिटर उंचीच्या इमारतींच्या बांधकामांस परवानगी दिली जात असल्यामुळे उंच इमारतींच्या आगीपासुनच्या संरक्षणासाठी विदेशी बनावटीची सुरक्षा यंत्रणा असलेली 32 मिटर उंचीचा हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म वाहन अग्निशमन विभागात कार्यरत आहे. तसेच आत्पकालीन परिस्थितीवर तोंड देण्यासाठी विविध प्रकारची लहानमोठी 29 अग्निशामक वाहने आहेत.

- अग्निशमन विभागासाठी आस्थापना खर्चासाठी 11.15 कोटी अग्शिशमन विभागाचे आधुनिकीकरण करणे यासाठी ३ कोटी  आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी रु.०.०७ कोटी या प्रमाणे एकत्रित आस्थापनासह महसुली  व भांडवली कामांसाठी एकुण रु.१४.२२ कोटी एवढी तरतुद सन 2018-2019 चे अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे.  भांडवली खर्चासाठी वित्तीय वर्ष सन 2017-2018 रु.10 लक्ष तरतुद करण्यात आली होती. सदरची तरतुद रु.2.90 कोटीने वाढवुन र.रु.3.00 कोटी करण्यात आलेली आहे.

## ➢ <u>मिळकत विभाग</u>

- नाशिक मनपा मालकीच्या मिळकती सन 2012 पावेतो महासभा/स्थायी समिती ठरावाव्दारे नाममात्र दराने रुपये 1 ते 100 अथवा काही ठिकाणी यापेक्षा थोडी अधिक रक्कम आकारुन देण्यात येत होत्या.

- नाशिक महानगरपालिका,मिळकतींचा दि.05/07/2016 रोजी झालेल्या सर्वेनुसार महानगर पालिका क्षेत्रातील एकूण 903 मिळकतींची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | करार मुदत असलेले | करार मुदत संपलेले | ठरावान्वये ताब्यात असलेले | विना मंजुरी ताबा असलेले | मनपा वापर/ अंगणवाडी/ बालवाडी/ विनावापर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पंचवटी | 3 | 12 | 69 | 121 | 26 | 231 |
| 2 | नाशिक पुर्व | 3 | 26 | 1 | 98 | 58 | 186 |
| 3 | नाशिक पश्चिम | 9 | 27 | 16 | 36 | 30 | 118 |
| 4 | नविन नाशिक | 3 | 27 | 4 | 83 | 48 | 165 |
| 5 | सातपूर | 4 | 14 | 3 | 10 | 68 | 99 |
| 6 | नाशिकरोड | 2 | 30 | 0 | 52 | 20 | 104 |
| | **एकूण** | **24** | **136** | **93** | **400** | **250** | **903** |

- वरिलप्रमाणे विनामंजुरी देण्यात आलेल्या, करारमुदत संपलेल्या, बाजार भावापेक्षा कमी असणा-या सर्व मिळकती हया मनपाच्या ताब्यात घेऊन संबंधितांकडून त्याबाबतची वसुली करण्यात येणार आहे. तसेच सदर मिळकती बाजारभावानुसार लिलाव प्रक्रियेने देण्यात येणार आहे त्यामुळे नाशिक महानगरपालिकेचा महसुल मोठया प्रमाणात वाढणार असुन मालमत्तांचा विनियोग योग्य प्रकारे होण्यास तसेच गैरवापर रोखण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे लिलाव प्रक्रियेने सदर मालमत्ताचे वाटप झाल्यास नैसर्गिक न्याय तत्वाचे व घटनेचा अनुच्छेय 14 अन्वये समानतेच्या तत्वाचे पालन होणार आहे.

- नाशिक मनपा क्षेत्रामध्ये मनपाचे महाकवी कालिदास कलादालन,महात्मा फुले कलादालन, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह,पंडित विष्णु दिगंबर सभागृह,दोन टाऊन हॉल तसेच बुध्द विहार, फाळके स्मारक आहेत.

- महाकवी कालिदास कलादालन,महात्मा फुले कलादालन या प्रकल्पांचा स्मार्ट सिटी अंतर्गत नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यावर अनुक्रमे रु.9.58 कोटी व महात्मा फुले कलादालन यासाठी रु.2.88 कोटी इतका खर्च होणार आहे. सदर काम पुर्णत्वास आले असुन लवकरच सदर कलादालनाचे लोकार्पण करण्यात येईल.

- स्व.दादासाहेब फाळके स्मारकाचे सद्यस्थितीत मनपा मार्फत देखभाल व दुरूस्ती केली जाते. तथापि उत्पन्न व खर्च विचारात घेता उत्पन्नापेक्षा खर्च खुपच अधिक आहे. त्या अनुषंगाने विचार करता स्व.दादासाहेब फाळके स्मारकाचे सार्वजनिक खाजगी सहभाग (Public-Private Participation) धर्तीवर नुतनीकरण करणे प्रस्तावित आहे.

- नाटयगृहे/फाळके स्मारक/सभागृहे यांसाठी सन 2018-2019 मध्ये र.रु.9.42 कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. मागील वित्तीय वर्षात रु.5.13 कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती. वित्तीय वर्ष 2018-2019 मध्ये रु.4.29 कोटी अधिकची तरतुद करण्यात आली आहे.

- नाशिक महानगरपालिका क्षेत्रात एकुण पाच तरण तलाव आहेत पैकी पंचवटी येथील तरण तलाव सार्वजनिक खाजगी सहभाग (Public-Private Participation) तत्वावर चालविणेस दिला आहे. सद्यस्थितीत उर्वरीत चार तरण तलाव मनपा मार्फत चालविले जातात.

- तरणतलाव देखभाल व दुरूस्ती अंतर्गत स्वा.सावरकर जलतरण तलाव येथील डायव्हींग प्लॅटफॉर्म (Diving Platform) जुना व धोकेदायक झाल्याने काढण्यात आलेला असुन त्या जागी अद्ययावत डायव्हींग प्लॅटफॉर्म (Diving Platform) उभारणे प्रस्तावित आहे. वित्तीय वर्ष 2018-2019 मध्ये महसुली कामांसाठी रु.3.17 कोटी तरतुद केली असुन त्यापैकी या नवीन डायव्हींग प्लॅटफॉर्म साठी अंदाजे र.रु.2.00 कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

- तरण तलावां कारिता आस्थापनासह महसुली व भांडवली कामांसाठी एकुण सन 2018-2019 मध्ये र.रु.5.88 कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. मागील वर्षी सदरची तरतुद रु.3.84 कोटी इतकी होती. यामध्ये 52.93 टक्के वाढ करण्यात आलेली आहे.

## ➢ <u>शहरी गरीबांसाठी घरे</u>

- झोपडपट्ट्यांची वाढती संख्या हे झपाट्याने होणाऱ्या शहरी करणाचे परीणाम आहे. झोपडपटयांमुळे शहराच्या मुलभूत सुविधांवर जरी ताण येत असला तरी शहराच्या विकासात झोपडपट्टीवासियांचे योगदान नाकारणे अशक्य आहे. भाजीविक्रेते, घरकामा करणारे नोकर (स्त्री/पुरुष),सफाई कामगार, रिक्षावाले,टॅक्सी ड्रायव्हर अशा विविध रुपात झोपडीधारक हे शहरी सुविधांचा कणा ठरले आहे.त्यामुळे या सेवा पुरवणाऱ्या यंत्रणेला दुर्लक्षून शहराच्या विकासाचे नियोजन करणे हे विसंगत ठरेल. या बाबींचा विचार करता झोपडपट्टी मुक्त शहराचा विकास साधत असताना शासन विविध घरकुल योजनांच्या माध्यमातून झोपडपट्टीवासीयांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा ही हेतू साधण्याचा प्रयत्न करीत आहे. या धर्तीवर नाशिक महानगरपालिका मार्फत शहरी गरिबांसाठी योजना राबविण्यात येतात.

- **रमाई आवास योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना**

- सदर योजने अंतर्गत शासनाच्या निकषाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्र रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध यांना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.स्वता: च्या मालकीचे झोपडी/ कच्चेघरे अथवा मोकळे जागा असणाऱ्या लाभार्थ्यांना सदर योजने अंतर्गत शासनाकडील सुधारित शासन निर्णय दिनांक ०७ जानेवारी २०१७ अन्वये रु.२.५० लाखापर्यंत घरकुल बांधणेसाठी व दुरुस्तीसाठी अनुदान देण्यात येणार आहे.सदर योजनेची जाहिरात वर्तमान पत्रातून स्लम भागात पत्रके देऊन पत्र लाभार्थ्यानकडून विविध नमुन्यात आवश्यक कागदपत्रे जोडून,सदर योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो. योजनेसाठी अर्ज स्वीकारण्यासाठी विभागीय कार्यालयात व्यवस्था करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी गृहनिर्माण समिती निर्माण करण्यात आलेली आहे. शासनाकडून सदर योजने अंतर्गत रु.२ कोटी ५६ लक्ष २० हजार इतके अनुदान प्राप्त असून,३३ पात्र लाभार्थ्यांना ४९ लक्ष ८० हजार अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

**शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा पुरविणे (बी.यु.एस.पी.) योजना**

- केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मुलन विभाग मार्फत सन २००५ पासून भारतातील ६३ शहरांमधील शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा पुरविणे (बी.एस.यु.पी.) व घरकुल बांधणी हि योजना राबविण्यात येत आहे.

- सदर योजने अंतर्गत पात्र झोपडी धारकास शासनामार्फत बांधण्यात येणाऱ्या इमारतीतील २६९स्क्वे.फुटाची सदनिका दिली जात आहे.सदर सदनिकेत, एक हॉल, किचन, संडास व बाथरूम असून सर्व सुविधांनी युक्त सदनिका देण्यात येत आहे.
- नाशिक शहरातील शिवाजीवाडी,वडाळा,चुंचाळे,साम्राटनगर,शिवनगर,भीमवाडी व संजय नगर-मजुरवाडी, निलगीरीबाग, गीताई नगर,हॉटेल साई पॅलेस,चेहेडी सामनगाव,गांधी धाम या ठिकाणांवर एकूण ७४६० घरकुले बांधण्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर योजनेत आजपावेतो पूर्ण झालेल्या एकूण ५८१७ घरकुलांची सोडत काढण्यात आलेली आहे. उर्वरीत सर्व सोडत दि.31.03.2018 अखेर पुर्ण करुन घरांचे वाटप करण्यात येणार आहे.

**प्रधान मंत्री आवास योजना -**

- केंद्रीय दारिद्र्य निर्मुलन व गृहनिर्माण मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा करण्यात आलेली आहे.राजीव आवास योजनेचे सुधारित रूप प्रधानमंत्री आवास योजना असून राज्य शासंना मार्फत दि.०९ डिसेंबर २०१५ रोजी प्रधानमंत्री आवास योजनेच्या अमलबजावणी बाबत शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.
- केंद्र शासनाचे जाहीर केलेल्या सर्वांसाठी घरे २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये खालील **चार** घटक समाविष्ट आहेत.

  1) जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपट्टयांचा"आहे तेथेच" पुनर्विकास करणे.
  2) कर्ज सलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.
  3) खाजगी भागीदारी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.
  4) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तीक स्वरूपातील घरकुल बांधण्यास अनुदान.

- घटक क्रमांक 1 अंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करण्यात आले असून एकूण १६७ झोपडपट्टयांमध्ये ४२८०३ झोपडयांची संख्या असून ५४७५२ इतक्या कुटुंबाची संख्या आहे.एकूण लोकसंख्या १९९८५० असल्याचे सर्वेक्षणानुसार आढळते.
- घटक क्रमांक २,३ व ४ अंतर्गत मागणी सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार एकूण ५१०१० अर्ज प्राप्त आहे. शासन मार्गदर्शनानुसार घटक निहाय कार्यवाही करण्यात येत आहे. सन 2018-2019 मध्ये पी.एम.ए.वाय अंतर्गत सर्व योजना प्रभावी पणे राबविण्याचे उदिष्ठ आहे.

## ➢ माहिती व तंत्रज्ञान विभाग

- ई- गव्हर्नन्स E-Governance
- महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये संगणकीय कार्यप्रणाली व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्व सेवा आणि त्याबाबतची कार्यालयीन प्रक्रिया ऑनलाईन करण्याचा मानस आहे. यामध्ये मानवी हस्तक्षेप कमीत कमी होईल व सर्व प्रक्रीया नियमानुसार विहित वेळेत पार पाडल्या जातील.
- याअनुषंगाने महानगरपालिकेतील सेवा हमी कायदयांतर्गम 16 सेवा हया ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर इतरही अत्यावश्यक सेवा ऑनलाईन करण्यात येऊन सर्वसाधारण पणे

60 पेक्षा जास्त सेवा ऑनलाईन करण्याचा मानस आहे. सदर प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी व उचित कार्यवाही करण्यासाठी संगणक विभाग सक्षम करण्यात येणार असुन विभागाच्या माध्यमातुन सर्व विभागांना मार्गदर्शन व त्यांच्या संगणकीय व ऑनलाईन सुविधा प्रक्रिया पार पाडण्यासाठी मदत करण्यात येईल व यामध्ये जुनी संगणकीय कार्यप्रणाली बदलुन नवीन सॉफ्टवेअर विकसित करणे इ. गोष्टी करण्याचा मानस आहे.

- नागरिकांना महापालिकेशी संबंधित कामे कमीत कमी त्रासात सहज करता यावीत याद्दष्टीने ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. याकरिता सर्वप्रथम नाशिक महानगरपालिकेची वेबसाईट www.nashikcorporation.in चे रुपांतर gov.in असे शासकीय करुन वेबसाईटला सरकारी अधिकृतता व त्यातून सुरक्षितता प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय वेबसाईटचे रुप पालटुन त्यावर नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध होण्याकडे विशेष् लक्ष देण्यात येणार आहे.

- ऑनलाईन करभरणा सुविधा देण्यासोबतच ऑनलाईन तक्रार निवारण प्रणाली (Grievance Management System) मध्ये सुधारणा करुन कालमर्यादीत व परिणामकारक तक्रार निवारण सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.यामध्ये तक्रार दाखल केल्यानंतर ती योग्य् त्या विभागाकडे याप्रणालीद्वारे ऑटोमॅटीक वर्ग होणे त्यामुळे तक्रारदार नागरिकाला तक्रारीशी संबंधित विभाग माहित नसला तरी योग्य् विभागाकडे ती तक्रार आपोआप पाठविली जाणे. याप्रणालीमध्ये तक्रारीच्या निवारणाची कालमर्यादा 7 दिवस इतकी निश्चित केली असुन तिचे पालन करणे अनिवार्य आहे. तक्रारदार नागरिकांने तक्रार दाखल केल्यानंतर तक्रारदारास SMS द्वारे तात्काळ त्यांचा ट्रॅकींग नंबर मिळतो. सदर तक्रार संबंधित अधिका-याने 24 तासात पाहणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सदर तक्रार याप्रणालीद्वारे ऑटोमॅटीक त्यांच्या वरिष्ठ् अधिका-याकडे वर्ग होणार आहे व काम न करणा-या अधिका-याच्या श्रेणीवर त्याचा परिणाम होणार आहे. याप्रणालीमध्ये मानवी हस्तक्षेपाला जागा नसल्यामुळे ही अत्यंत पारदर्शी व कालमर्यादीत परिणामकारक कार्यप्रणाली ठरणार आहे. याप्रणाली बरोबरच मोबाईल ॲप देखील सुधारणा करण्यात आली आहे.

- तक्रार निवारण प्रणाली मध्ये आजपावेतो 1352 तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्यापैंकी 1107 तक्रारींचे निराकरण करण्यात आले असुन उर्वरीत तक्रारींचे निराकरण लवकरात लवकर करण्यात येईल.

- Don't ask me to think या तत्वावर आधारित ई-गव्हनर्स ऑनलाईन सेवा वापरण्यासाठी तीनपेक्षा जास्त् Click ची आवश्यकता नसल्याने ही अतिशय सुलभ व वापरण्यास सोपी सेवा आहे.

- याशिवाय महानगरपालिकेकडून सेवा हमी कायद्यांतर्गत उपलब्ध् होणारे विविध प्रकारचे परवाने, दाखले, प्रमाणपत्रे, ऑनलाईन उपलब्ध करुन दिले जाणार असून नागरिकांना घरबसल्या Digitally Signed Certificate व दाखले उपलब्ध करुन देणेचा मानस असुन लवकरच त्यानुसार कार्यप्रणालीमध्ये व कामकाजामध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

- या सेवा ऑनलाईन उपलब्ध असणयासोबतच सध्याचे मोबाईल वापराचे सार्वत्रिक प्रमाण लक्षात घेता त्या सेवा मोबाईलच्या एका क्लिकवर उपलब्ध असाव्यात याद्दष्टीने मोबाईल ॲप मध्ये सुधारणा करण्यात येणार असुन नागरिकांना अगदी चालता चालता आपल्या स्मार्ट फोनच्या एका क्लिकवर विविध सेवा उपलब्ध करुन घेता येणार आहे.

- पारदर्शक व्यवहाराच्या दृष्टीने महानगरपालिकेचे कोणतेही पेमेंट थेट पुरवठादाराच्या बँक खात्यात जमा होणारी होस्ट टू होस्ट ही अभिनव प्रणाली राबविण्यात येणार आहे. ज्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता येणार आहे.
- हे करीत असताना नागरिकांची कागदपत्रांमुळे अडचण होऊ नये यादृष्टीने सकारात्मक विचार करीत पूर्वी परवान्यांकरिता आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणेत येणार आहे. अशाप्रकारे ऑनलाईन परवाना मिळण्याचा कालावधी कमी करण्यात येणार आहे. त्याकरिता आवश्यक Business Process Re-Engineering करण्यात येवुन त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.
- ई-गव्हनर्स प्रणालीचा प्रभावी वापर सुरु झाल्यानंतर नागरिक महानगरपालिका कार्यालयात न येता आपले घर/ कार्यालय इ.ठिकाणाहून महानगरपालिकेशी संबंधित कर भरणा करणे, तक्रारी/सूचना करणे, परवाने/दाखले मिळविणे अशी विविध कामे ऑनलाईन करु शकतात. ज्यायोगे मानवी हस्तक्षेप टाळल्यामुळे कामकाजात पारदर्शकता राहते व गतिमानता येते, त्यामुळे एकाधिकारशाही (Monopoly) कमी होते. त्याचप्रमाणे होस्ट टू होस्ट पेमेंट पध्दतीमुळे थेट बँक खात्यात पेमेंट जमा होणार असल्याने कंत्राटदारांना चेकची वाट पाहण्याची गरज न भासता कामकाजातील गुंतागुंत कमी होऊन दर्जेदार सेवा देणे शक्य् होणार आहे.
- ई- गव्हनर्सच्या सहाय्याने एकाधिकारशाही कमी करणे, अधिकाऱ्यांच्या योग्य् अयोग्य् निवडीचा स्वेच्छाधिकार कमी करुन नियमानुसार निवड होईल अशाप्रकारे जबाबदारी निश्चित करणे व पारदर्शकता वाढविणे या तत्त्वार आधारित प्रणाली विकसित करणेत येत असुन कामकाजामध्ये पारदर्शकता व वेग वाढविण्यात येणार आहे व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
- महानगरपालिकेतील विविध विभागांच्या दैनंदिन कामाकरिता इंटिग्रेटेड एन्टरप्राईजेस सोल्युशन विकसीत करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे कामकाजाची गती वाढणे, कामकाजात पारदर्शकता येणे, नागरिकांना कमीत कमी क्लीकवर सेवा उपलब्ध करणे, सर्व माहिती कायम स्वरुपी उपलब्ध करुन देणे शक्य् होणार आहे.
- महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या कामकाजात ई-गर्व्हनसच्या प्रभावी वापर करुन कामकाजात गतिमानता येण्याच्या दृष्टीने नवीन संगणक, प्रिटर्स व स्कॅनर्स घेण्यात येणार आहेत.
- नगररचना विभागात बांधकामा साठीच्या पुर्वीच्या कार्यपध्दतीत सुलभता आणण्यासाठी बांधकाम परवानगी, जोते तपासणी व भोगवटा प्रमाणपत्र यासाठीची कागदपत्रे व मान्यतेबाबतची कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करणेकामी Business Process Re-Engineering करण्यात आली असुन परवानगीचा कालावधी कमी करणे,कागदपत्रांची संख्या कमी करणे,इत्यादी सुधारणा राबविण्यात येऊन दाखला व प्रमाणपत्र प्राप्त होण्याचे प्रक्रियेमध्ये सुट्सुटीतपणा आणण्यात येत आहे.
- यासर्व उपाययोजना करणेकरीता सन 2018-19 या वर्षासाठी अर्थसंकल्पामध्ये र.रु 5.89 कोटी इतकी भरीव तरतुद केलेली आहे.
- ई- हॉस्पीटल संगणकीय कार्यप्रणाली महानगरपालिका रुग्णालयांमध्ये कार्यान्वित करण्यात येणार असुन त्याद्वारे रुग्णांना गतिमान सेवा पुरविण्यात येणार आहे.

- नागरिकांचे अर्ज, टपाल व नस्ती यांचे विहित कालावधीत कार्यवाही होणेकामी तसेच विविध विषयांच्या टपालांचे व नस्तींचे विस्तृत कार्यविवरण होऊन ते निकाली काढणेकामी सदर बाबींचे पुर्णपणे संगणकीकरण करण्यात येणार असुन प्रशासकीय कामामध्ये पारदर्शकता व गतीमानता आणण्यात येणार आहे.
- C.S.R. च्या माध्यमातुन नगररचना विभागातील अभिलेख्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन प्रस्तावित आहे.
- नगररचना विभागातील अंदाजे एकुण 65 लक्ष कागदपत्रे असुन त्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन C.S.R. च्या माध्यमातुन कोटक महिंद्र बँकने करुन देण्याचे प्रस्तावित केले आहे. सदर स्कॅनिंग व डिजिटायझेशन करीता आवश्यक तंत्रज्ञान व मनुष्यबळ हे बँकेमार्फत मोफत पुरविण्यात येणार आहे. मनपास सदर संस्थेस केवळ जागा व संगणकीय साहित्य उपलब्ध करुन दयावयाचे आहे. सदर कामास लवकरच सुरुवात करण्यात येईल.
- मागील वर्षी नमुद केलेनुसार नाशिक मनपाने एकुण 22 ठिकाणी ई-सुविधा केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. नागरी सुविधा केंद्र हे C.S.R.च्या माध्यमातुन येस बँकेमार्फत मोफत चालविण्यात येत असुन त्यामुळे मनपाच्या मनुष्यबळामध्ये व खर्चामध्ये ब-याच अंशी बचत झाली आहे. आता पुढील टप्प्यामध्ये सदर ई- सुविधा केंद्राचा विस्तार वाढविण्याचे प्रस्तावित असुन सदर ई- सुविधा केंद्र हे P.P.P. तत्वावर कार्यान्वित करावयाची योजना आहे. यामध्ये ज्या व्यक्ती किंवा संस्थांची स्वत:ची जागा असेल व ते संगणक व इंटरनेट यांचा खर्च करावयास तयार असतील अशा संस्था किंवा व्यक्तींकडुन सुरक्षा अनामत घेवुन काही अटीशर्तीचा अधीन राहुन नागरी सुविधा केंद्र P.P.P. तत्वावर चालविण्यास देण्याचे प्रस्तावित आहे.
- माहिती व तंत्रज्ञान विभागा करिता आस्थापनासह महसुली व भांडवली कामांसाठी एकुण र रु.६.९१ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये भांडवली खर्चासाठी रु.6.07 कोटी तरतुद असुन सन 2017-2018 मध्ये रु.3.30 कोटी इतकी तरतुद होती यात 83.79 टक्केनी वाढ करण्यात आलेली आहे.

## ➢ गोदा प्रकल्प - नदीकाठच्या क्षेत्राचा विकास

- गोदावरी नदीकाठच्या क्षेत्राचा विकास करीत असतांना शहराचे पर्यावरण, ऐतिहासिक महत्व व मनोरंजनात्मक सुखसोयी उपलब्ध करण्याचा विचार करण्यात आला आहे.
- गोदावरी नदी काठच्या परिसर हा स्वच्छ, हरित, अध्यात्मिक व गतिमानतेच्या दृष्टीने विकास करण्यात येणार आहे, हे करत असताना गोदावरी नदीचे मुळ वैभव परत मिळवणे म्हणजेच गोदाकाठ विकसीत करत असताना त्या भागातील विविध वैशिष्टे व मर्यादा विचारात घेऊन मनोरंजन व पर्यटनाच्या वेगवेगळया सुविधा आणि आजुबाजूच्या क्षेत्राचा पर्यावरण अनुकूल विकास करण्यात येणारआहे.
- गोदावरी नदीकाठच्या क्षेत्राचा विकासाचा मास्टर प्लॅन **पाच** मुद्दयांच्या संकल्पनाने मार्गदर्शित केला आहे.

  1) गोदावरी घाटांचे पुनरुज्जीवन- नदीच्या पात्रातील कॉक्रीटीकरण व लहान बंधा-यांमुळे नदीची खोली आणि प्रवाह कमी झाला आहे. सदरचे स्त्रोत पुर्नजिवीत करण्याचे योजले आहे.

  2) धार्मिक आणि मनोरंजक उपक्रमांसाठी क्षेत्रांचे विभाजन करणे- गोदावरी नदीकाठच्या मनोरंजक क्षेत्राचा विकास धार्मिक विधीच्या क्षेत्रापासून विभाजीत करुन स्वतंत्रपणे विकसीत करण्यात येणार आहे.

3) गोदावरी नदी किना-यावरील लक्ष्मण कुंड, गांधी तलाव, नारोशंकर मंदिर, गाडगे महाराज पुल येथील अनाधिकृत आणि सतत होणा-या वाहनांच्या पार्किगमुळे ऑफ स्ट्रीट पार्किंगचे स्वरुप प्राप्त झाले आहे. या क्षेत्रांत पार्किंग निर्बंधीत करुन पादचारी अनुकूल वातावरण तयार करण्याचा प्रस्ताव आहे.

4) नदीकाठच्या विविध क्षेत्रांतुन मुक्तपणे संचार करण्यासाठी संपूर्ण नदीकाठा लगत सायकल ट्रॅक प्रस्तावित केलेला आहे. तसेच जॉगिंग व चालण्यासाठी पादचारी रस्ता व नौकाविहारासाठी जेटी पॉईंट प्रस्तावित आहे.

5) धार्मिक विधीसाठी आवश्यक आसणा-या पुजा सामग्रीच्या विक्रीसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

- अध्यात्मिक क्षेत्र  होळकर पुल ते गाडगे महाराज पुल या क्षेत्रामध्ये कुंडाचे कॉक्रीट काढणे आणि नदीचे पात्र रुंद करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच घाटाच्या परिसरातील भाविकांच्या हालचालीचा प्रवाह सुधारण्यासाठी नदीच्या पात्रात अतिक्रमण न करता घाटांच्या पाय-यांची सुधारणा करणे यासाठी बसाल्ट/नेवासा खडकाचा वापर करण्यात येणार आहे.
- रामवाडी पुल ते होळकर पुल हा भाग ग्रीन रिक्रीऐशनल म्हणून विकसीत करण्याचे योजिले आहे. गोदापार्कचा मनोरंजक व नैसर्गिक भाग म्हणून पुर्नविकास करण्याचा प्रस्ताव आहे. नदीकाठच्या उपलब्ध नैसर्गिक उता-यावर एक प्रेक्षागृह विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. गोदापार्क ते होळकर पुलापर्यंत नदीकाठच्या असणा-या गॅबियन वॉलच्या समांतर कॉबलस्टोन पादचारी रस्ते आणि सायकल ट्रॅक विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. रामवाडी पुलावरील वाहतुकीचा ओघ कमी करण्यासाठी समांतर पुलाचा विकास करणे. तसेच होळकर पुलावरील पादचा-यांच्या सोयीसाठी समांतर स्वतंत्र पादचारी पुल विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. सुंदर नारायण मंदिराचा पायथा नदीशी जोडण्यासाठी घाटांचा विकास करुन याच घाटांलगत नौकाविहारासाठी जेटी पॉईंट विकसित करणे. पुर नियंत्रणासाठी होळकर पुलाखाली न्युमॅटीकली स्वयंचलित यांत्रिकी दरवाजे बसवण्याचा प्रस्ताव आहे.
- गाडगे महाराज पुल ते टालकुटेश्वर पुल ओपन रिक्रीऐशनल  म्हणून विकसन करावयाचे आहे. यात सायकल ट्रॅक, कोबल स्टोन अस्तरीकरण आणि वृक्षलागवड हे ओपन रिक्रीऐशनल भागातील मुख्य घटक आहे. गाडगे महाराज पुलाजवळ स्वतंत्र पार्किंगची जागा प्रस्तावित केली आहे.

**प्रस्तावित प्रकल्पात विकासाचे मुख्य घटक खालीलप्रमाणे आहेत:**

- गोदावरी व तिच्या उपनदयांची साफसफाई
- वाघाडी नदीचा पुर्नविकास
- अरुणा व वाघाडी नदी जलनिस्सारण व मलनिस्सारण योजना राबविणे.
- हनुमान घाट ते रामवाडी पर्यंत पुल बांधणे
- चिंचबन ते गंगावाडीपर्यंत पादचारी पुल बांधणे
- न्युमॅटीकली स्वंयचलित यांत्रिकी दरवाजे उभारणी
- गोदा गार्डनचा विकास
- गोदा पादचारी मार्गाचा विकास
- सुंदरनारायण घाट व रामवाडी पुलाजवळ जेटीचे बांधकाम
- नदीच्या बाजुला सायकल ट्रक बांधणे
- वृक्षरोपण व लँडस्केपींगव्दारे क्षेत्राचा विकास
- माहिती व संकेतस्थळे दर्शविणारे विविध फलक बसविणे
- दगडी बाकडे बसविणे

- स्मार्ट सिटी अंतर्गत प्रकल्पाचा अंदाजीत खर्च रु.१२८.४७ कोटी आहे. वरील सर्व कामे निवीदा प्रक्रियेपासुन १८ महिन्यांच्या आत पुर्ण करण्याचे प्रस्तावीत आहे.

## ➢ नाशिक शहर बससेवा

- नाशिक शहर बससेवा आजमितीस महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळामार्फत चालविणेत येत आहे. नाशिक शहराची लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली असुन त्या दृष्टीने रस्त्यांचे रुंदीकरणही ब-याच प्रमाणात झालेले आहे.परंतु शहर बससेवेसाठी उपलब्ध असलेल्या बसची संख्या कमी असुन उपलब्ध बसेस या सुस्थितीत नाही. तसेच सद्याच्या बससेवेमध्ये असलेले बसमार्ग पर्याप्त नाही व सद्याचे बसमार्गांमध्ये सुसुत्रता नाही. त्यामुळे शहरातील नागरीकांना अंतर्गत वाहतूकीसाठी चांगल्या बससेवेचा पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे नागरीकांचा दैनंदिन प्रवासासाठी खाजगी वाहनांचा वापर करण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे शहरात रस्त्यावर खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठया प्रमाणावर वाढून रहदारीस अडथळे येत आहेत. तसेच शहरातील प्रदुषण वाढत आहे.
- परिवहन मंडळाने नाशिक मनपास पत्र देवून शहर बसवाहतुकीमुळे होणाऱ्या तोटयाची भरपाई मिळावी अथवा शहर बस सेवा बंद करणेत येईल असे कळविले आहे. तसेच मागील काही महिन्यात शहर बस वाहतूकीच्या अनेक फे-या कमी केल्या आहेत. अशा परिस्थितीत नाशिकमध्ये शहर बससेवेची पुर्नरचना करणे अत्यावश्यक झाले असुन नागरीकांना शास्वत स्वरुपाची शहर बस वाहतूकसेवा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.
- वरील प्रमाणे शहर बस वाहतूकीची सद्यस्थिती व नागरीकांना सुलभ सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी नाशिक शहर बस वाहतुक नाशिक महानगरपालिकेने चालविणेबाबत व्यवहार्यता तपासणेसाठी (फिजीबीलीटी स्टडी) महासभा ठराव क्रमांक 266 दि.20.07.2017 अन्वये मंजुरी मिळालेनुसार मे.क्रिसील या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्यानुसार सल्लागाराने अंतिम फिजीबीलीटी स्टडी अहवाल सादर केल्यानंतर शहर बससेवा मनपा मार्फत चालविणेबाबत निर्णय घेऊन सन 2018-2019 या वर्षात बससेवा चालु करण्याचा मनोदय आहे.
- चालू वर्षात नाशिक महानगरपालिकेमार्फत शहर बससेवा चालू करणेचे नियोजन आहे. शहरात सार्वजनिक वाहतूकीचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देण्यात येईल. शहर बससेवेसाठी सुरवातीस सुमारे 200 बसेस उपलब्ध करुन दयाव्या लागतील. त्यामध्ये अरुंद मार्गासाठी मध्यम आकाराच्या बसेस घ्याव्या लागतील. तसेच बससेवा सुरु करणेसाठी बस डेपो,बस टर्मिनल्स,बस शेल्टर इत्यादी पायाभूत सुविधा उभाराव्या लागणार आहेत.
- सर्वसामान्यांना सुरक्षित व सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येईल. शहर बससेवेसाठी माहिती व तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणेत येईल. शहर बससेवेचे वेळापत्रक,विविध मार्ग,बस येण्या-जाण्याच्या वेळा इत्यादी बाबत सर्व माहिती मोबाईल ॲप्लीकेशनवर नागरीकांसाठी उपलब्ध राहिल. तसेच बस येण्याच्या वेळेबाबत पुर्वसुचना (Alarm), तक्रार निवारण सुविधा (Grievance) या व अशा स्वरुपाच्या सुविधा नागरीकांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहिल. आयटीएमस चा वापर करुन अद्यावत बस सेवा नागरीकांसाठी उपलब्ध करणेत येईल. आवश्यक्तेनुसार सदर तरतुद वाढविणेत येईल.
- यामुळे नागरीकांना शास्वत सार्वजनीक वाहतूकीचा पर्याय उपलब्ध होऊन शहरातील रस्त्यांवरील खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी होईल. तसेच शहरातील प्रदुषण कमी होण्यास मदत होईल.
- शहर बससेवेसाठी सन 2018-19 साठीचे अंदाजपत्रकात र.रु.30 कोटी तरतूद करणेत आलेली आहे. आवश्यक्तेनुसार सदर तरतुद वाढविणत येईल.

## खर्च बाजुचा संक्षिप्त गोषवारा खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| अ.नं. | लेखाशिर्ष | सन 201६-201७ मा.आयुक्तांनी केलेला सुधारीत अंदाज | सन 2017-18 मा. आयुक्तांनी केलेले सुधारीत अंदाज | सन 2018-19 मा. आयुक्तांनी केलेला मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|
| **(1)** | **(2)** | (३) | (४) | (५) |
| 1 | कर्मचारी वेतन खर्च | २८५१४.५० | 30697.01 | 32441.00 |
| 2 | पेन्शन खर्च | ६४००.०० | 7200.00 | 8400.00 |
| 3 | शिक्षण विभाग मनपा हिस्सा खर्च | ४५६५.५१ | 3638.08 | 6444.00 |
| 4 | कर्ज मुद्दल परतफेड खर्च | ५००.०० | 1300.00 | 3000.00 |
| 5 | कर्जावरील व्याज खर्च | १७००.२५ | 1500.00 | 2500.00 |
| 6 | कार्यालयीन खर्च | ९१७२.८० | 10781.60 | 11034.25 |
| | **एकुण (1 ते 6) खर्च** | **५०८५३.०६** | **55116.69** | **63819.25** |
| 7 | देखभाल दुरुस्ती खर्च | २२८८३.४७ | 19815.40 | 26001.70 |
| **8** | **एकुण बांधील खर्च (एकुण महसुली खर्च) (1 ते 7)** | **७३७३६.५४** | **74932.09** | **89820.95** |
| 9 | 19% खर्च बाबी (महसुली कामे) | १८९७.६६ | 2870.52 | 3348.17 |
| 10 | 19% खर्च बाबी (भांडवली कामे) | ४९७०.०६ | 7518.02 | 8769.02 |
| **11** | **एकुण 19% खर्च बाबी (9 + 10)** | **६८६७.७२** | **10388.54** | **12117.19** |
| | **शासकीय अनुदानातील मनपा हिस्सा-भांडवली खर्च** | | | |
| 12 | JNNURM - 30% मनपा हिस्सा | ५०००.०० | 1500.00 | 300.00 |
| 13 | JNNURM - मुकणे धरण | ५०००.०० | 4000.00 | 3000.00 |
| 14 | स्मार्ट सिटी - मनपा हिस्सा | ५०००.०० | 10000.00 | 5000.00 |
| 15 | अमृत योजना - मनपा हिस्सा | ०.०० | 2000.00 | 4000.00 |
| 16 | पंतप्रधान आवास योजना- मनपा हिस्सा | ०.०० | 100.00 | 200.00 |
| 17 | सिंहस्थ कामे (मनपा अंतर्गत) | ११५००.०० | 1000.00 | 500.00 |
| **18** | **एकुण - शासकीय अनुदाना तील मनपा हिस्सा (12 ते 17)** | **१६५००.००** | **18600.00** | **13000.00** |
| | **भांडवली खर्च -** | | | |
| 19 | जमिन संपादन (मनपा अंतर्गत) | १२५००.०० | 10500.00 | 10000.00 |
| 20 | जमिन संपादन (सिंहस्थाकरीता) | २६३२.१० | 2450.00 | 1000.00 |
| 21 | इतर भांडवली खर्च | २१९०४.०३ | 17879.00 | 41016.00 |
| **22** | **एकुण -भांडवली खर्च (18+19+20+21)** | **५३५३६.१३** | **49429.00** | **65016.00** |
| **23** | **एकुण महसुली व भांडवली खर्च (8+22)** | **१२७२७२.६७** | **124361.09** | **154836.95** |
| 24 | इतर उचल रक्कमा खर्च | ४७६७.८३ | 5691.50 | 11369.90 |
| **25** | **एकुण खर्च (11 + 23 + 24)** | **१३८९०८.२३** | **140441.13** | **178324.04** |

सन 2017-2018 चे सुधारीत जमा रक्कम अंदाज रु.1453.40 कोटी, एकुण खर्च 1404.41 कोटी चे सुधारीत अंदाज मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहेत. तसेच सन 2017-18 च्या सुधारीत जमा अंदाजाच्या तुलनेत सन 2018-19 मध्ये रु.331.75 कोटी एवढया रक्कमेची वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. सदरची वाढ 22.83 टक्के इतकी असुन रु.1785.15 कोटी एकुण जमा रक्कमेचे (प्रारंभिक शिल्लक रु.48.99 कोटी सह) व खर्च रु.1783.24 कोटी असे रु.1.91 कोटी शिलकेसहचे नाशिक महानगरपालिकेचे सन 2018-19 चे अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे त्यास मान्यता मिळणेस विनंती आहे.

धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

नाशिक :
दिनांक : 22 /03/2018

**तुकाराम मुंढे**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक**